दैनिक

# ग्लोबल भारत

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

dailyglobalbharat@gmail.com

संपादक - शरद खेमचंद अडागळे

www.globalbharatlive.com

❑ औरंगाबाद ❑ वर्ष ५ वे ❑ अंक ३२ वा ❑ मंगळवार दि.२२ ऑक्टोबर २०२४ ❑ पाने ८ ❑ मुल्य ५ रू


## मविआतील जागा वाटपांचा तिढा आज सुटणार

### ठाकरे गटाच्या भुमिकेनंतर पटोले ऐवजी बाळासाहेब थोरातांकडे समन्वयकाची जबाबदारी

मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये होत असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाची चर्चा अक्षरशः ठप्प झाली आहे. गेल्या तीन दिवसांपासून काँग्रेस आणि ठाकरे गटांमध्ये विदर्भातील जागांवरून सातत्याने एकमेकांवरती आरोप प्रत्यारोप होत असल्याने जागावाटपाची चर्चा पुढे जाऊ शकलेली नाही. दरम्यान, जागा वाटपामध्ये आता काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी मोठा निर्णय घेतला आहे. जागावाटपामध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना बाजूला करून आता समन्वयाची जबाबदारी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये ठाण मांडून बसलेल्या काँग्रेस नेत्यांपैकी बाळासाहेब थोरात उद्या मुंबईमध्ये येणार आहेत. बाळासाहेब थोरात यांच्याकडे शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चेची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे जागावाटपाचा निर्णय अंतिम होत नाही तोपर्यंत यादी सुद्धा काँग्रेसकडून प्रसिद्ध केली जाणार नाही, अशी माहिती समोर येत आहे.

’उद्या (२२ ऑक्टोबर) तीन वाजता मुंबईत महाविकास आघाडीची बैठक होईल. २५ तारखेपर्यंत सर्व जागांचा अंतिम निर्णय घेतला जाईल आणि २५ तारखेला जागावाटपाची घोषणा केली जाईल’, अशी महत्त्वाची माहिती दिल्लीतील काँग्रेसच्या नेत्यांनी दिली.

आता बाळासाहेब थोरात यांच्या एन्ट्रीनंतर तरी महाविकास आघाडीमधील जागावाटपाचा घोळ संपतो का? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. दरम्यान आजच्या बैठकीनंतर बोलताना बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, आजची बैठक व्यवस्थित पार पडली. अनेक नावांवरती काँग्रेसकडून शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. पुढील एक ते दोन दिवसांमध्ये काँग्रेसची यादी जाहीर होईल. दरम्यान, काँग्रेसच्या कार्यकारी समितीची पुन्हा एक बैठक होणार असून त्यानंतर बाकीची नावं अंतिम केली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

समन्वयाची जबाबदारी देण्यात आली आहे त्याबाबतीत बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, मल्लिकार्जुन खरगे यांनी मला उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशी बोलण्यास सांगितलं आहे. त्यामुळे मी उद्या (२२ ऑक्टोबर) त्यांच्याशी चर्चा करणार आहे. जागावाटपावरून तिढा आहे असं म्हणता येणार नाही. मात्र, चर्चा होईल आणि चर्चेतून मार्ग निघेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. उद्याच्या पत्रकार परिषदेच्या संदर्भात त्यांना विचारले असता ते म्हणाले की उद्या दुपारी एक वाजता महाविकास आघाडीची पत्रकार परिषद आहे की नाही याबाबत मला माहिती नाही. मात्र, उद्या दुपारी तीन वाजता आम्ही पुन्हा एकदा महाविकास आघाडीचे नेते चर्चेला बसणार आहोत.

विदर्भामधील जागांवर ठाकरे गट अडून बसल्याने काँग्रेस आणि ठाकरेंमधील वाद टोकाला गेला आहे. विदर्भात ठाकरे गटाकडून १४ जागांची मागणी करण्यात आली आहे, दोन्ही पक्षांतील जागावाटपावर दिल्लीतून मार्ग निघाला आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनी मध्यस्थी करत विदर्भातील जागा वाटपाचा तिढा सोडवला असून आजच्या आज महाविकास आघाडीचे नेते हा विषय संपुष्टात आणणार आहेत. विशेष म्हणजे आज-उद्यामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या याद्या जाहीर केल्या जाण्याची शक्यता आहे अशीही माहिती समोर आली आहे. आज दिल्लीत काँग्रेस निवडणूक समितीची बैठक झाली. या बैठकीनंतर चेन्निथला यांनी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा अंतिम निर्णय कधी होईल, याची माहिती दिली. काँग्रेस निवडणूक समितीची आज दिल्लीत बैठक झाली. या बैठकीला पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी, सोनिया गांधी यांच्यासह महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, मुंबई काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

## पोलिसांच्या चकमकीत गडचिरोलीत ५ माओवादी ठार

गडचिरोली दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये विध्वंसक कारवाया करून घातपात घडविण्याच्या उद्देशाने मागील दोन दिवसांपासून काही माओवादी एकत्र येऊन कट रचण्याच्या तयारीत होते. गडचिरोली महाराष्ट्र व नारायणपूर छत्तीसगड सीमेलगत असलेल्या कोपर्शी तालुका भामरागड जंगल परिसरात हे माओवादी दबा धरून बसल्याची गोपनीय माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाल्याने अप्पर पोलीस अधीक्षक अभियान यतिश देशमुख व अप्पर पोलीस अधीक्षक प्रशासन एम .रमेश यांचे नेतृत्वात सी ६० पथकाच्या २२ तुकड्या व सीआरपीएफ च्या च्या ०२ तुकड्या या कोपर्शी जंगल परिसरात मोहीम राबवत आहेत. येथील दोन वेगवेगळ्या ठिकाणी माओवाद विरोधी अभियान राबविण्याकरिता या तुकड्या रवाना करण्यात आल्या आहेत. त्यातच, आज माओवादी व जवानांमध्ये चकमक झाल्यानंतर ५ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे.

गडचिरोली पोलिसांचे पथक जंगल परिसरात पोहोचताच माओवाद्यांनी पोलीस पथकाच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार करण्यास सुरुवात केली. यावेळी पोलीस पथकाकडून माओवाद्यांना शस्त्र खाली टाकून शरण येण्याचे आवाहन करण्यात आले होते. परंतु, माओवाद्यांनी शरण न येता पोलीस पथकावर अंदाधुंद गोळीबार सुरू ठेवला. गोळीबाराला प्रत्युत्तर देताना पोलीस पथकाकडून दोन्ही वेगवेगळ्या ठिकाणी गोळीबार करावा लागला, या अभियानात ०५ माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलीस दलास यश प्राप्त झाले झाले. जंगल परिसरात शोधमोहीम सुरू असून मृत माओवाद्यांची ओळख पटवण्याची प्रक्रिया पोलिसांकडून सुरू आहे.

## राज ठाकरेंकडून पहिली यादी जाहीर

मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली जात आहे. भाजपाने काल (२० ऑक्टोबर) उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यानंतर एकापाठोपाठ एक अनेक संभाव्य याद्या समोर येऊ लागल्या. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात कडवी लढत होत असताना आता राज ठाकरेंनीही मैदानात उडी घेतली आहे. त्यांनीही आज दोन उमेदवारांची नावे जाहीर केली. ते डोंबिवली बोलत होते.

‘‘उमेदवारांच्या यादीवर शेवटचा हात फिरवला जातो आहे. आज किंवा उद्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर होईल. पण त्यापूर्वी कल्याण ग्रामीणमधून मी राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांची उमेदवारी जाहीर करतो आहे. येत्या २४ तारखेला मी दोघांचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी येत आहे’’, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली.

## लडाखमध्ये गस्तीच्या नवीन प्रणालीवर भारत-चीन सहमत

### दोन्ही देश एलएसीमधून सैन्य मागे घेऊ शकतात, यामुळे गलवानसारखा संघर्ष टाळता येईल

नवी दिल्ली दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यापूर्वी भारत आणि चीनमध्ये मोठा करार झाला आहे. दोन्ही देशांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याचे मान्य केले आहे. यामुळे पूर्व लडाखमधील दोन्ही देशांमधील सीमा विवाद मिटू शकतो आणि संघर्ष कमी होऊ शकतो.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिंश्री यांनी सोमवारी या कराराची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, भारत आणि चीनचे अधिकारी गेल्या अनेक आठवड्यांपासून या मुद्द्यावर बोलत होते. या चर्चेत लष्कराचे अधिकारीही सहभागी झाले होते.

गस्तीच्या नवीन प्रणालीवर सहमती झाल्यानंतर दोन्ही देश आपले सैन्य मागे घेऊ शकतात. सध्या डेपसांग प्लेन डेमचोकमधील पेट्रोलिंग पॉईटवर सैनिकांना जाण्याची परवानगी नाही. सैन्य आजही येथे आहे. पेट्रोलिंगची नवीन यंत्रणा या पॉइंट्सशी संबंधित आहे. यासह, २०२० च्या गलवानसारखे संघर्ष टाळता येतील.

१ ऑक्टोबर रोजी भारतीय लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी म्हणाले होते की (पान ४ वर)

## संभाजीराजेंच्या तिसऱ्या आघाडीचे ८ उमेदवार जाहीर, बच्चू कडू अचलपूरमधून; सांगलीत २ उमेदवार



**परिवर्तन महाशक्तीचे घोषित करण्यात आलेले उमेदवार**

१. अचलपूर - बच्चू कडू - प्रहार
२. रावेर - अनिल चौधरी - प्रहार
३. चांदवड - गणेश निंबाळकर - प्रहार
४. देगलूर - सुभाष सामने - प्रहार
५. ऐरोली - अंकुश कदम- महाराष्ट्र स्वराज पक्ष
६. हदगाव हिमायतनगर - माधव देवसरकर - महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
७. हिंगोली - गोविंदराव भवर - महाराष्ट्र राज्य समिती
८. राजुरा - वामनराव चटप - स्वतंत्र भारत पक्ष

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून उमेदवारांची घोषणा होत आहे. भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून महायुतीमधील इतरही घटक पक्ष लवकरच यादी जाहीर करणार आहेत. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आघाडी घेतली असून ६६ उमेदवारांची घोषणा केली आहे. आता, यंदा उदयास आलेल्या तिसऱ्या आघाडीकडूनही उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी आणि आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील परिवर्तन आघाडीने आपल्या ८ उमेदवारांची नावे जाहीर केली असून स्वाभिमानीच्या २ उमेदवारांची नावे उद्या २२ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहेत. दरम्यान, परिवर्तन महाशक्तीकडून जाहीर करण्यात आलेल्या पहिल्या यादीत आमदार बच्चू कडू यांचं नाव असून बच्चू कडू यांना अचलपूर मतदारसंघातून प्रहारच्या चिन्हावर उमेदवारी जाहीर करण्यात आलीय.

व्हिजन महाराष्ट्र म्हणून बाकीच्या राज्याने आदर्श घ्यावा असं (पान ४ वर)

## ऊसतोड कामगार संघटनेचं महायुतीला थेट आव्हान, राज्यातील या ५ जागा लढविणार, बैठकीत निर्णय

मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्यात विधानसभा निवडणुकांचं बिगुल वाजलं असून राज्यात निवडणुकीचा रणसंग्राम पहायला मिळत आहे. निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. आता भाजपची उमेदवारांची यादी आली आहे. यात बीड जिल्ह्याचा फॉर्म्युला समोर आला आहे. दरम्यान, बीड मधून भाजपा आणि पंकजा मुंडे यांना ऊसतोड कामगार संघटनांनी थेट आव्हान दिले आहे. ऊसतोड कामगारांच्या ९ संघटनांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी केलीय. याच अनुषंगाने बीडमध्ये संघटनांनी बैठक बोलावली होती. या बैठकीतून राज्यातील सहा जागेवर दावा करत लढणार असल्याचे सांगितले आहे.

राज्यामध्ये २२ लाख ऊसतोड कामगार आहेत. त्यातील एकट्या बीड जिल्ह्यात चार लाख ८५ हजार मजूर आहे. त्यांचे नेतृत्व आजपर्यंत दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या माध्यमातून होत होतं. त्यानंतर पंकजा मुंडे यांनी या ऊसतोड कामगारांचा नेतृत्व केलं. परंतु आता सत्तेत वाटा मिळावा म्हणून ऊसतोड कामगार संघटनांनी बंड पुकारात राज्यातील पाच जागेवर दावा केला आहे.

बीड, (पान ४ वर)

## ५०० रुपयांचे बाँड घेऊन उमेदवार भेटीला, मनोज जरांगेचं सर्वच इच्छुकांना बाँड पेपरबाबत महत्त्वाचं आवाहन

जालना दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकांसाठी आपली भूमिका जाहीर केली आहे. राज्यातील काही निवडक मतदारसंघात आपण उमेदवार जाहीर करत असल्याचं त्यांनी म्हटलं. तसेच, एसी,एसटी मतदारसंघात आपण उमेदवार देणार नाही आणि ज्या मतदारसंघात उमेदवार देणार नाही, त्या मतदारसंघातील जो उमेदवार आम्हाला ५०० रुपयांच्या बाँडवर मराठा आरक्षणासंदर्भात लिहून देईल, त्यांना पाठिंबा देण्यात येईल, असे जरांगे पाटील यांनी जाहीर केलं होतं. त्यानंतर, अंतरवाली सराटीत ५०० रुपयांच्या बाँडवर लिहून देत उमेदवार पोहोचत आहेत. त्यावर, आता मनोज जरांगे यांनी महत्त्वाचं आवाहन केलंय. जरांगे पाटील यांच्या घोषणेनंतर त्यांच्याकडे ५०० रुपयांच्या बाँडवर लिहून देत येणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढली आहे. ज्या मतदारसंघात मनोज जरांगे पाटील यांच्याकडून उमेदवार देण्यात येणार नाही, त्या मतदारसंघातील इतर पक्षाच्या उमेदवारांकडून बाँडवर लिहून घेतलं जाणार आहे. त्यामुळे, सध्या बाँड घेऊन अंतरवाली सराटी येथे जाणाऱ्यांची संख्या वाढल्याने मनोज जरांगे यांनी बाँड घेऊन येणाऱ्या उमेदवारांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे.

तुम्ही थेट बाँड घेऊन आमच्याकडे येऊ नका, सध्या काय व्हायलयं कुणीही ५०० रुपयांचा बाँड घेऊन आमच्याकडे यायलंय. त्यामध्ये, एखाद्याकडे पैसे नसतील तर तो उसने पैसे घेऊन (पान ४ वर)

## अजित पवार गटाकडून एबी फॉर्म वाटपास सुरुवात

### यादी पूर्वीच १७ जणांना दिले एबी फॉर्म, भाजपमधून आलेल्या गावितांनाही संधी

मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भापजची पहिली यादी रविवारी जाहीर करण्यात आली. आज शिंदे गट आणि अजित पवार गटाची उमेदवार यादी जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, यादी जाहीर होण्याआधीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून सोमवारी १७ जणांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. यामध्ये भरत गावित, सुनिल टिंगरे, संजय बनसोडे, चेतन तुपे यांसह १३ जणांना अर्ज देण्यात आले.

एबी फॉर्म मिळणाऱ्यांमध्ये राजेश विटेकर - परिषद आमदार (इच्छुक), संजय बनसोडे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, दिलीप वळसे पाटील, दौलत दरोडा, राजेश पाटील, दत्तात्रय भरणे, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, नरहरी झिरवळ, छगन भुजबळ, भरत गावित, बाबासाहेब पाटील, अतुल बेनके आदींचा समावेश आहे.

भरत गावित हे आधी भाजपमध्ये होते. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता. आता त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने (पान ४ वर)

## भाजपसोबत युती म्हणजे औरंगजेब-अफजल खानाशी हातमिळवणी-संजय राऊत



मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- ‘‘संजय राऊतांची अमित शाहांशी भेट झाली हे सांगितलं जातय, ही हास्यास्पद गोष्ट आहे. काँग्रेस नेते असे दावे करत असतील तर त्यांचंही आश्चर्य वाटत आहे. शिवसेनेने फक्त संघर्ष केलेला नाही, तर आमच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आलं होतं. आमचा पक्ष फोडला, आमचं सरकार पाडलं. आमचं चिन्ह त्यांनी चोरलं. त्याही पेक्षा हा महाराष्ट्र त्यांनी गद्दारांच्या हातात दिला. या वेदना घेऊन आम्ही संघर्ष केला. कोणी आमच्यावर कोणी शंका घेत असतील, तर ते एका बापाची औलाद नाहीत. त्यांनी त्यांचा बाप दाखवावा अन्यथा श्राद्ध घालावं‘‘, असं ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

संजय राऊत म्हणाले, स्वत:च्या स्वार्थासाठी आमच्या स्वाभिमानावर शिंतोडे उडवणारे हे लोक आहेत. अशा अफवा पसरवून कोणी लढणार असेल तर त्यांना महाराष्ट्रात राजकारण करण्याचा अधिकार नाही. कोणी सुपाऱ्या दिल्या याची बातमी आमच्याकडे आली आहे. आमचीही यंत्रणा आहे. एक वेगळं पेगासेस आमच्याकडे सुद्धा आहे. कोण कोणाकडून अफवा पसरवून घेतय, हे आमच्याकडे आहेत. शिवसेना महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी तडजोड करणार नाही. महाराष्ट्राचा स्वाभिमान पायदळी तुडवणारांशी आम्ही हात मिळवणी (पान ४ वर)

## हिंदुत्व शब्द बदलण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

नवी दिल्ली दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सोमवारी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. हिंदुत्व हा शब्द बदलण्याची मागणी करणारी एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सोमवारी सुनावणी पार पडली. या याचिकेत ‘हिंदुत्व’ हा शब्द बदलण्याची मागणी करण्यात आली होती. ही याचिका डॉ.एस.एन. कुंद्रा यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी नाराजी व्यक्त केली.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी या याचिकेवरील सुनावणीवेळी महत्वाची टिप्पणी देखील केली. हिंदुत्व या शब्दाऐवजी भारतीय संविधान हा शब्द वापरण्याची मागणी करणारी याचिका डॉ.एस.एन. कुंद्रा यांनी दाखल केली होती. या याचिकेवर विचार करण्यास सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी नकार दिला. ही सुनावणी आज सोमवारी (२१ ऑक्टोबर) सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यासह तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली.

(पान ४ वर)

## मनोज जरांगेंनी शरद पवारांच्या पक्षात जावे; ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांचा टोला

### ५० उमेदवार उभे करुन दाखवण्याचे आव्हान

पुणे दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्यातील काही ओबीसी आमदार गत अनेक वर्षांपासून निवडून येत आहेत. पण त्यांनी ओबीसींच्या प्रश्नावर कोणतीही ठाम भूमिका घेतली नाही. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत ओबीसी प्रश्नावर ठाम भूमिका घेऊन पाठिंबा देणाऱ्या उमेदवारांनाच आमचे पाठबळ राहणार आहे, असे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी सोमवारी स्पष्ट केले. मनोज जरांगे यांनी ताकाला जावून भांडे लपवण्याचा प्रयत्न न करता शक्य होईल तेवढ्या लवकर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करावा, असेही ते यावेळी म्हणाले.

लक्ष्मण हाके यांनी सोमवारी येथे पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी मराठा आंदोलक यांच्या विधानसभा निवडणूक लढवण्याच्या घोषणेचे स्वागत केले. तसेच ओबीसी नेत्यांचेही कान टोचले. ते म्हणाले, मराठा नेते मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे संकेत दिलेत. त्यांचे आम्ही स्वागत करतो. लोकशाहीच्या उत्सवात जिथे लोकांचे प्रश्न सोडवले जातात. त्यांनी ५० उमेदवार उभे करावे. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात लवकर प्रवेश करावा. ताकाला जावून भांडे लपवू नये. त्यांनी जर-तरची भाषा न बोलता निवडणुकीला सामोरे जावे. मनोज जरांगे यांना पाठिंबा देणाऱ्यांना यावेळी ओबीसी मतदार मतदान करणार नाही.

लक्ष्मण हाके पुढे म्हणाले, मागील ६-७ महिने मनोज जरांगे हे महाराष्ट्र म्हणजे आम्ही या अविर्भावात वावरले. पण पाडापाडीची भाषा करणाऱ्यांना उमेदवार देखील मिळत नाही. संविधानाची शपथ घेऊन बेकायदा जीआर काढले जातात. तिथे निवडणुकीसाठी बाँड लिहून घेणाऱ्या जरांगेच्या स्टॅम्प पेपरला कोण ऐकणार आहे. त्यांनी ५० उमेदवार तरी उभे करुन दाखवावे. जी गोष्ट घडणार नाही ती बेकायदेशीर मागणी करुन समाजात अस्वस्थता निर्माण करुन कोणाच्या तरी दावणीला जाऊन समाजास बांधू नये. मनोज जरांगे यांनी सरळ - सरळ तुतारी चिन्हावर आपले उमेदवार उभे करावेत. शरद पवार गटात जाऊन निवडणूक लढवावी व राजसत्तेत जाऊन समाजाचे प्रश्न सोडवावेत.

मनोज जरांगे यांनी सुपारी घेणे बंद करावे. (पान ४ वर)

## गौरी लंकेश हत्या प्रकरणातील आरोपीची शिंदेंच्या शिवसेनेतील प्रवेशानंतर दोनच दिवसांत हकालपट्टी

जालना दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- बंगळुरुमधील ज्येष्ठ पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी श्रीकांत पांगारकरने शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांनाही उधाण आलं होतं. यावरून अनेकांनी प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला होता. तसेच विरोधकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीकेची झोड उठवली. सर्व स्थरातून टीका होऊ लागल्यानंतर अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीकांत पांगरकरची शिवसेनेतून हकालपट्टी केली. शिवसेनेचे माजी मंत्री अर्जुन खोतकर यांच्या उपस्थितीत श्रीकांत पांगरकरने शुक्रावारी शिवसेनेत प्रवेश केला होता.

एवढंच नाही तर श्रीकांत पांगरकरची जालना विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार प्रमुख म्हणून नियुक्ती देखील करण्यात आल्याची माहिती सांगितली जात होती. मात्र, नियुक्ती केल्याच्या दोन दिवसांत म्हणजे रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने श्रीकांत पांगरकरची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. दरम्यान, गौरी लंकेश हत्या प्रकरणातील आरोपी श्रीकांत पांगरकर हा काही दिवसांपूर्वी जामिनावर बाहेर (पान ४ वर)

# वसाहतीतून 'बेट'सुटले!

मॉरिशसचा भाग असलेल्या चेगोस द्वीपसमूहावरील ताबा सोडण्यास ब्रिटन अखेर राजी झाला आहे. पन्नासहून अधिक वर्षांपासून सुरू असलेला वाद यामुळे आता संपुष्टात येईल आणि वसाहतवादातून आणखी एका बेटाची सुटका होईल. ब्रिटन आणि मॉरिशस यांच्यात नुकताच चेगोस द्वीपसमूहाच्या बाबतीत झालेल्या कराराची नोंद इतिहासात नक्कीच घेतली जाईल. हिंदी महागासागरात सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा असलेला हा द्वीपसमूह खरे तर मॉरिशसचा भाग; परंतु त्याच्यावर ब्रिटनचा कब्जा आहे. गेल्या पन्नासहून अधिक वर्षांपासून याबाबत या दोन्ही देशांत वाद होता. मूलनिवासींना हुसकावून ब्रिटनने केलेल्या या कृतीला संयुक्त राष्ट्रांनी बेकायदा ठरविल्यानंतरही हा वाद संपुष्टात आलेला नव्हता. ब्रिटनने चेगॉसचा ताबा सोडावा यासाठी मॉरिशसबरोबरच चेगॉस बेटांवरील मूळ नागरिकही लढा देत होते. ब्रिटिशांच्या वसाहतवादाच्या विरोधातील लढा, असेही याचे स्वरूप होते. हा लढा आता संपुष्टात आला असून, चेगोस द्वीपसमूह मॉरिशसला परत देण्यास ब्रिटन राजी झाला आहे. ब्रिटन आणि मॉरिशस या दोन्ही देशांनी याबाबतच्या कराराला मान्यता दिली आहे. या द्वीपसमूहातील दिएगो गार्सियावरील अमेरिकी तळ पुढील ९९ वर्षांपर्यंत सुरू राहील, या अटीवर ब्रिटनने चेगोस सोडण्यास मान्यता दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून मॉरिशसने, तसेच चेगोसवासीयांनी ब्रिटिशांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली होती. दोन वर्षांपूर्वी त्यांनी ब्रिटिशांचा झेंडा काढून आपला झेंडा फडकावला होता. ही कृती प्रतीकात्मक असली, तरी आपली भूमी परत घेण्याचा निर्धार त्यात असल्याची विधानेही त्यावेळी केली गेली. चेगोस द्वीपसमूहांवरील आपला कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्यासाठी या बेटांवरील मूलनिवासींसह मॉरिशसचे शिष्टमंडळ पेरॉस बानहोस येथे आले होते. साठच्या दशकात ब्रिटिशांनी या बेटांवरील मूळ नागरिकांना हुसकावून लावले होते. यांपैकी काही तब्बल पन्नास वर्षांनंतर सोमवारी प्रथमच आपल्या मायभूमीत परतले होते. बोटीतून उतरल्यानंतर अनेकांना भावना अनावर झाल्या होत्या, अनेकांना अश्रू रोखता आले नव्हते. प्रतीकात्मक ध्वज फडकावण्याच्या त्यांच्या कृतीने त्यावेळी जगाचे लक्ष वेधून घेतले होते. मॉरिशसचे संयुक्त राष्ट्रांतील तत्कालीन राजदूत जगदीश कुंजूल यांनी त्यावेळी चेगोसवासीयांची भूमिका जोरकसपणे मांडली होती. या घटनेला दोन वर्षे झाल्यानंतर आता चेगोस द्वीपसमूह मॉरिशसला परत मिळत आहे. त्यामुळे मॉरिशसमध्ये आनंदाचे वातावरण असले, तरी मूळ चेगोवासीयांच्या भावना संमिश्र असल्याचे चित्र आहेत. एक प्रदीर्घ लढा यशस्वी झाल्याचे समाधान त्यांना आहे; परंतु या वाटाघाटीच्या साऱ्या प्रक्रियेत आपल्याला सामील करून न घेतल्याची त्यांची तक्रारही आहे. 'आमचे पूर्वज या बेटांवरील मूळनिवासी. आमचे या बेटांशी असलेले नाते वेगळे आहे. त्यामुळे त्यांच्याशी संबंधित निर्णय होताना आम्हाला विचारात घेणे आवश्यक होते; परंतु तसे झाले नाही. ब्रिटिश तिथून निघून जात आहेत, हे मात्र स्वागतार्ह आहे,' अशी एक प्रातिनिधिक प्रतिक्रिया ब्रिटनमध्ये स्थायिक असलेल्या तीन हजारांहून अधिक चेगोसवासीयांची आहे. दीर्घ काळचा वाद संपुष्टात आल्याची आणि आपली स्वप्नपूर्ती झाल्याची भावना वयाने ज्येष्ठ असलेल्या पिढींतील चेगोसवासीयांची आहे; तर त्यांच्या तरुण पिढीला नागरिकत्वाबद्दलचाही प्रश्न भेडसावतो आहे. चेगोस द्वीपसमूह हिंदी महासागरात असून, साठहून अधिक बेटांचा त्यात समावेश होतो. त्यांपैकी काही प्रवाळद्वीप आहेत. मालदीवच्या दक्षिणेला पाचशे किलोमीटर अंतरावरील हा द्वीपसमूह सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. अठराव्या शतकापासून तो मॉरिशसचा भाग मानला जातो; त्यावेळी मॉरिशस ही फ्रेंचांची वसाहत होती. १८१०मध्ये मॉरिशस फ्रेंचांकडून ब्रिटिशांकडे आला. त्यामुळे मॉरिशसमधील सर्व बेटेही ब्रिटिशांच्या अंमलाखाली आली. मॉरिशस १९६५मध्ये स्वतंत्र झाला. मात्र, चेगोस द्वीपसमूहाचे महत्त्व लक्षात घेऊन ब्रिटिशांनी त्याचे मॉरिशसकडे हस्तांतर करण्यास नकार दिला. या बेटांवरील लोकांना हुसकावून लावले. मॉरिशसच्या तत्कालीन नेत्यांनी ब्रिटिशांना विरोध केला असला, तरी तो सौम्य होता. मात्र, या बेटांवरील दावा त्यांनी कायम ठेवला. ब्रिटनने या समूहाचे 'ब्रिटिश इंडियन ओशियन टेरिटरी' असे नामकरण केले आणि त्याचा भाग असलेला दिएगो गार्सिया ब्रिटनने अमेरिकेला पन्नास वर्षांच्या करारावर दिला. तिथे अमेरिकेने हिंदी महासागरातील शक्तिशाली नाविक तळ उभारला. २०१६मध्ये हा करार संपल्यानंतर मॉरिशसने त्यावर हक्क सांगितला; परंतु त्याला दाद न देता ब्रिटनने हा करार आणखी वीस वर्षांनी वाढविला. या बेटांवरून विस्थापित झालेले नागरिक दीर्घ काळापासून लढा देत आहेत. आपली भूमी परत मिळावी यासाठी त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेचे आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे दरवाजे वेळोवेळी ठोठावले आहेत. २०१९मध्ये या दोन्ही संस्थांनी मॉरिशसच्या बाजूने कौल देत, चेगोस द्वीपसमूहावरील दावा सोडून देण्याचा आदेश ब्रिटनला दिला. या द्वीपसमूहावर ब्रिटनने केलेला कब्जा बेकायदा असल्याचे आंतरराष्ट्रीय न्यायालयाने म्हटले खरे; परंतु त्याचा ब्रिटनवर काहीही परिणाम झाला नव्हता. त्याच वर्षी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत या द्वीपसमूहाच्या मुद्द्यावरून मतदान झाले. सहा महिन्यांच्या आत ब्रिटनने चेगोसवरील ताबा सोडावा, असा ठराव त्यावेळी मंजूर झाला. ११६पैकी फक्त सहा देशांनी त्याला विरोध केला होता. विरोधकांत ब्रिटन आणि अमेरिका यांचा समावेश होता. वसाहतीला स्वातंत्र्य देण्यापूर्वी मुख्य भूभागापासून दूर असलेली बेटे ही वेगळा टापू असल्याची भूमिका ब्रिटनने या ठरावानंतरही घेतली आणि बळाच्या जोरावर चेगोस द्वीपसमूह आपल्या ताब्यात राहील, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. या द्वीपसमूहावर मॉरिशसची कधीच सार्वभौम सत्ता नव्हती; त्यामुळे त्याचा दावा आपल्याला मान्य नाही, अशी भूमिका ब्रिटन घेत राहिला. संरक्षणासाठी असलेली गरज संपुष्टात आल्यानंतर ही बेटे मॉरिशसला दिली जातील, असे २०२०मध्ये ब्रिटनने म्हटले होते; ही गरज कधी संपेल हा प्रश्न तेव्हापासून विचारला जात होता. त्याच्या उत्तरासाठी मॉरिशस सातत्याने पाठपुरावा करीत होता. ब्रिटनबरोबर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आणि अखेर चेगोस द्वीपसमूहातील सर्व बेटे ब्रिटन आता राजी झाला आहे. मात्र, संरक्षणाच्या मुद्द्यावरही त्याचा भर आहे. म्हणूनच दिएगो गार्सिया बेटावरील लष्करी तळ कायम राहणार आहे. अमेरिकेसाठी हा तळ सामरिकदृष्ट्या फारच महत्त्वाचा आहे. अमेरिकेने दहशतवादाच्या विरोधात छेडलेल्या युद्धात या तळाने मोलाची भूमिका बजावली होती. अमेरिका आणि ब्रिटन या तळाचा गैरवापर करीत असल्याचा आरोपही आधीपासून होतो आहे. दोन वर्षांपूर्वी, मॉरिशसच्या शिष्टमंडळाने या द्वीपसमूहाला दिलेली भेट ऐतिहासिक ठरली यात शंकाच नाही. ही बेटे परत करावीत, असे त्यावेळी करण्यात आलेल्या आवाहनाला ब्रिटनने नकारात्मक प्रतिसाद दिला होता.

# त्याग कुणाचा, लाभ कुणाला?

देशात सुसंस्कृत, प्रगतिशील नि पुरोगामी राज्य असलेल्या महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत राजकारणाचा चिखल झाला आहे. सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी कोणत्या पक्षाला मतदान केले होते व नंतर कोण कुठे गेले व त्यातून जनतेला काय मिळाले? सत्तेच्या परिघात वावरणाऱ्या बहुतेक नेत्यांनी आपल्या आचरणाने विश्वासार्हता गमावली आहे. मतदारांनी निवडून दिल्यावर आपण जनतेचे सेवक आहोत, याचा गेल्या पाच वर्षांत त्यांना साफ विसर पडला आहे. आपल्याला कोणी मोठे केले, आपल्याला कोणी राजकारणात बोट धरून आणले, यापेक्षा आता झटपट सत्तेच्या पदावर कोण संधी देतोय यालाच अग्रक्रम दिला जातोय. पक्षनिष्ठा, परंपरा, आचार-विचार, चरित्र आणि चारित्र्य, पारदर्शकता, साधनशुचिता हे सर्व शब्द गेल्या पाच वर्षांत सत्ता संघर्षाच्या गोधडीत गुंडाळले गेले. काहीही करू पण सत्ता हवीच, सर्व सरकारी यंत्रणा आपल्या दारी हवी, अशी मानसिकता राजकारणात तयार झाली आहे. गेल्या महिन्यापासून जनतेला खूश करण्यासाठी फुकटच्या योजनांचा वर्षाव सरकारने केला तरी राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेलाच गेलेला तडा भरून कसा निघणार?

यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या संघर्षाला महायुती विरुद्ध महाआघाडी, भाजपा विरुद्ध काँग्रेस, एकनाथ शिंदे विरुद्ध उद्धव ठाकरे, काका विरुद्ध पुतण्या असे अनेक कंगोरे आहेत. पण राज्यातील जनतेसाठी कोणी लढतंय असे दिसत नाही, तर सर्वच पक्ष व नेते आपल्या अस्तित्वासाठी मैदानात उतरले आहेत. बहुतेक नेते हे स्वत:चे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी आणि आपल्या परिवाराला सत्तेच्या परिघात जागा मिळवून देण्यासाठी पराकाष्ठा करताना दिसत आहेत.

राज्यात महायुतीचे सरकार आहे. जागा वाटपापासून भाजपा, शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) या तिघांची खेचाखेच होणे अटळ आहे. निकालानंतर ज्याचे जास्त आमदार निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल अशी टूम निघाली, तर आपण कमी पडायला नको ही त्यामागची खेळी आहे. जास्तीत जास्त जागा लढवायच्या व जास्तीत जास्त आमदार निवडून आणायचे, हाच सौदेबाजी करतानाचा आधार असतो. महायुती असो किंवा महाआघाडी, दोन्हीकडे जागा वाटप कळीचा मुद्दा होता. महाआघाडीत काँग्रेस व उबाठा सेना यांच्यात रस्सीखेच बघायला मिळाली, तर महायुतीत भाजपा व शिवसेना यांच्यात चढाओढ दिसून आली. शिंदे मुख्यमंत्री व फडणवीस उपमुख्यमंत्री. पण दोघांचे अनुयायी सौदेबाजीत कसलेले आहेत. त्यातून त्यागाचा मुद्दा अचानक पुढे आला.

निवडणुकीचा कार्यक्रम केंद्रीय आयोगाने जाहीर केल्यापासून आयाराम गयारामांचे पेव फुटले आहे. शरद पवारांच्या पक्षाकडे गेल्या दोन महिन्यांपासून रोज कुणीना कुणी मोठा नेता जातो आहे. तुलनेने अन्य पक्षांकडे आयाराम कमी आहेत. एकाच पक्षात वर्षानुवर्षे थांबून काहीच मिळत नाही, म्हणून त्रस्त झालेले कार्यकर्ते व नेते दुसऱ्या तंबूत जाताना दिसत आहेत. तसेच दोन-तीन वेळा आमदार होऊनही नेता थांबायला तयार नाही म्हणून इच्छुक अन्यत्र संधी शोधत फिरत आहेत.

येत्या दि. २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान होणार आहे. २०१९ ते २०१४ या पाच वर्षांत महाराष्ट्राचे राजकारण अक्षरश: ३६० अंशांत बदलले. अनपेक्षित व आश्चर्यकारक उलथापालथींची महाराष्ट्राला खरे तर सवय नव्हती. पाच वर्षांत अनेकदा राजकीय भूकंप झाले. दोन मोठे प्रादेशिक पक्ष दुभंगले, त्यातून दोन नवीन पक्ष निर्माण झाले. नव्या पक्षांनाच त्यांच्या आमदार-खासदारांचे संख्याबळ पाहून केंद्रीय निवडूक आयोगाने त्यांनाच मान्यता दिली व पक्षांचे अधिकृत निवडणूक चिन्हही बहाल केले. गेल्या पाच वर्षांत भाजपा, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, मनसे हे चार पक्ष आहे तसेच राहिले.

पाच वर्षांत सरकार स्थापनेचे तीन प्रयोग, तीन मुख्यमंत्री आणि पाच राजकीय धक्के महाराष्ट्राला बसले. सन २०१९ मध्ये भाजपा-शिवसेना युतीने व काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने विधानसभा निवडणूक लढवली होती. भाजपा-शिवसेना युतीला बहुमतही मिळाले, पण मुख्यमंत्री कोण या मुद्द्यावरून युती तुटली.

दि. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी महाराष्ट्रात भल्या पहाटे राजभवनावर नवीन सरकारचा शपथविधी चालू असल्याचे टीव्हीच्या पडद्यावर बघायला मिळाले. देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री व अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी शपथ देत असताना दिसले. निवडणुकीत कोण कोणाच्या विरोधात लढले व सरकार कोणी स्थापन केले हे जनतेला समजेनासे झाले. मोदी-शहांच्या संमतीशिवाय असे सरकार कसे स्थापन होऊ शकते? भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस असे विचित्र सरकार जन्माले आले पण अवघ्या ८० तासांतच या सरकारचा अंत झाला.

त्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना असा आघाडी सरकारचा दुसरा प्रयोग झाला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री व अजितदादा उपमुख्यमंत्री झाले. दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी ठाकरे यांचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. हे सरकार अडीच वर्षे तरले.

आघाडी सरकारच्या काळात दोन वर्षांहून अधिक काळ कोरोनाने राज्याला घेरले होते. कोरोना जाताच राज्यात सत्ता स्थापनेचा तिसरा प्रयोग झाला. महाआघाडीच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे हे नगरविकास मंत्री होते. त्यांनीच पुढाकार घेतला व हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून पक्षाच्या ४० आमदारांसह जून २०२२ मध्ये उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बंडाचा झेंडा फडकवला. शिवाय १० अपक्ष समर्थक आमदारही शिंदे यांच्याबरोबर आघाडीतून बाहेर आले. दि. २० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे व बंडखोर आमदार नॉट रिचेबल झाले. मुंबई, सुरत, गुवाहटी, गोवा असा प्रवास करीत मुंबईत परतले. या सर्व त्यागाची किंमत म्हणून भारत भ्रमणाचा खर्च कोणी केला? पंचतारांकित हॉटेल्स, लक्झरी कार, विमान प्रवास, सुरक्षा व्यवस्था यासाठी किती कोटी खर्च झाले हा प्रश्न कोणी विचारला नाही. बंडखोरांना खोकी, गद्दार म्हणून उबाठा सेनेने हिणवले. मतदारांना काहीच कळत नाही, असा तोडफोड करणाऱ्यांचा समज आहे काय?

दि. ३० जून २०२२ रोजी शिंदे यांनी मुख्यमंत्री व फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. २ जुलै २०२३ रोजी अजितदादांनी काकांच्या विरोधात पक्षात बंडाचा झेंडा फडकवला व तेही महायुतीत ४० आमदारांसह आले. उपमुख्यमंत्री म्हणून तेही महायुती सरकारमध्ये सामील झाले.

यंदाची विधानसभा निवडणूक मतदारांना गोंधळात टाकणारी आहे. महायुती विरुद्ध महाआघाडी असे ढोबळ चित्र दिसत असले तरी विरोधकांच्या मतविभाजनावर महायुतीने लक्ष्य केंद्रित केले आहे. विरोधकांमध्ये एकजूट नाही. जागा वाटप समाधानकारक नाही. आम्ही नाना पटोलेंशी चर्चा करणार नाही, असे उबाठा सेनेने काँग्रेसला स्पष्ट बजावले आहे. अपक्ष, बंडखोर, तिसरी आघाडी, मनसे अशी बहुरंगी लढत आहेच. शिवाय जातीय समीकरणांना फार मोठे महत्त्व आहे. मनसेने अगोदर मोदींना पाठिंबा दिला, नंतर विरोधात, नंतर पुन्हा व्यासपीठावर, आता स्वबळावर लढत आहे.

राज ठाकरे मंचावर उभे राहिले की लोक म्हणतात, लाव रे तो व्हीडिओ...

लोकसभेत अँटी मोदी-अँटी भाजपा मतदान झाले. मुस्लिमांची एकगठ्ठा मते उबाठा सेनेकडे सरकली आहेत. उबाठा सेना एमआयएमला का बरोबर घेत नाही, असा प्रश्न भाजपा विचारत आहे.

जागा वाटपात शिवसेना व भाजपा यांच्यात बरीच रस्सीखेच झाली. भाजपाने आपले १०५ आमदार असूनही त्याग केला व ४० आमदार असलेल्या शिंदेंना मुख्यमंत्रीपद दिले याची भाजपा वारंवार आठवण करून देत आहे. भाजपाने केलेल्या त्यागाची जाणीव ठेवा, असे शिंदे यांना अमित शहा यांनी सांगितल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. नंतर भाजपाला खुलासा करताना बरीच कसरत करावी लागली. आपल्या पक्षाचे जास्त आमदार असताना एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपद दिले, हे भाजपामधील फडणवीस समर्थकांना मुळीच रुचलेले नाही. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपद भाजपालाच मिळाले पाहिजे, अशी फिल्डिंग अगोदरपासूनच काहींनी लावली आहे. एकनाथ शिंदे हे फडणवीस यांनाही डोईजड होत आहेत, मोदी-शहांवर ते अधिक प्रभाव पाडून आहेत, तसेच मोदी-शहा यांची अधिक पसंती फडणवीस यांच्यापेक्षा शिंदे यांनाच आहे, अशी कुजबूज पक्षात ऐकायला मिळते. महायुतीला बहुमत मिळाले तर पुन्हा शिंदेच मुख्यमंत्री होतील असे शिवसेनेचे नेते ठामपणे सांगत आहेत, पण तशी धास्ती भाजपातील अनेकांना आतापासूनच वाटत आहे.

भाजपानेही आमच्या धाडसी व क्रांतिकारी उठावाची जाणीव ठेवावी, तुम्ही आम्हाला मुख्यमंत्रीपद दिले, पण आम्ही केलेल्या त्यागातूनच भाजपा सत्तेवर आहे याची आठवण शिंदेंचे शिलेदार करून देत आहेत. महाआघाडी सरकारने भाजपा नेत्यांना जेलमध्ये टाकण्याची तयारी केली होती, याचीही आठवण करून दिली जात आहे. आम्ही उठाव केला नसता तर भाजपा नेत्यांची काय अवस्था झाली असती, हेच एकापरिने सांगण्यात येत आहे. ऐन निवडणुकीच्या काळात भाजपा व शिवसेना एकमेकांना आपण केलेल्या त्यागाची आठवण करून देत आहेत. त्याग कोणाचा मोठा, भाजपाचा की शिवसेनेचा? फडणवीसांचा की शिंदेंचा? उद्धव ठाकरेंचा की अजितदादांचा? महायुती शिंदेंच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवत आहे पण शिंदे हेच मुख्यमंत्रीपदाचा चेहरा आहेत, असे युती सांगायला तयार नाही. महाआघाडीसुद्धा ठाकरे हे मुख्यमंत्रीपदाचा चेहरा आहेत असे म्हणायला तयार नाही. त्याग कोणत्या मुद्द्यावर केलाय? महागाई, भ्रष्टाचार, रोजगार, कायदा-सुव्यवस्था, शेतकरी आत्महत्या की आणखी काही? त्याग कुणासाठी केलाय? कार्यकर्त्यांसाठी की समाजासाठी? त्याग केला कुणी व लाभ कुणाला झाला?

**– डॉ.सुकृत खांडेकर**

# 'मु. पो. बोंबीलवाडी'' मध्ये प्रशांत दामले साकारणार हिटलर

'कोण होणार हिटलर?', या उभ्या महाराष्ट्राला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर आता मिळाले आहे. 'मु. पो. बोंबीलवाडी' या १ जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणाऱ्या बहुप्रतीक्षित चित्रपटात हिटलर भूमिकेत आहेत, ज्येष्ठ व लोकप्रिय रंगकर्मी श्री प्रशांत दामले. तीन लागोपाठच्या चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळविणाऱ्या परेश मोकाशी यांचा हा चित्रपट असल्याने रसिकांमध्ये जी उत्कंठा लागून राहिली आहे, ती हिटलरच्या भूमिकेत प्रशांत दामले असल्याचे जाहीर झाल्याने आता दुपटीने वाढली आहे.

हरिश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅट्रिकनंतर मधुगंधा कुलकर्णी आणि परेश मोकाशी घेऊन येत असलेल्या ''मु.पो. बोंबिलवाडी''मधील हिटलरच्या भूमिकेमध्ये कोण आहे, हा लाखमोलाचा प्रश्न रसिकांना पडला होता. हिटलरचा शोध घेण्यासाठी खरे तर प्रेक्षकांचा कल घेण्यात आला आणि त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. त्याशिवाय वैभव मांगले, प्रणव रावराणे, मनमीत पेम, सुनील अभ्यंकर, गीतांजली कुलकर्णी, रितिका श्रोत्री, अद्वैत दादरकर यांचीही नावे या स्पर्धेत पुढे होती. मात्र अंतिमतः शिक्कामोर्तब झाले ते, प्रशांत दामले यांच्या नावावर.

कोण होणार हिटलर?' या प्रश्नावरील पडदा लेखक, दिग्दर्शक परेश मोकाशी, निर्माते मधुगंधा कुलकर्णी आणि विवेक फिल्मस्, मयसभा करमणूक मंडळी यांनी आज उघडला आहे. चित्रपटाचे लेखन -दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे.

हिटलरच्या भूमिकेबद्दल विचारले असता प्रशांत दामले म्हणाले, ''मुळात हिटलर म्हटले की आपल्या डोळ्यासमोर एक आकृती येते, प्रकृती येते. मी माझ्या आयुष्यात असला हिटलर केला नाही आणि करणारही नाही. हे जे पात्र आहे त्याला हिटलर का म्हणावे हा प्रश्न पडावा असे हे पात्र आहे. ते करायला मिळावे आणि परेश व मधुगंधाबरोबर करायला मिळावे हे महत्वाचे. परेशबरोबर मी पहिल्यांदाच काम करत आहे. दिग्दर्शक कसा असावा तर तो असा असावा. तो एक अप्रतिम दिग्दर्शक आहे.''



आजच्या मराठी चित्रपटांबद्दल विचारल्यावर दामले म्हणाले, ''मराठी चित्रपटांबद्दल काही मला फार गती नाही, नाटकांबद्दल विचारले तर मी सांगू शकेन. मी फार कमी चित्रपट केले आहेत. दिग्दर्शक सांगेल तसे काम करणे ही माझी प्रकृती आणि वृत्ती आहे. कोरी पाटी घेवून बसले की काम करायला सोपे जाते. यात वैभव मांगले आहे, माझा लाडका दिग्दर्शक अद्वैत परळकर या चित्रपटात अभिनय करतो आहे, त्यामुळे एक वेगळा आनंद हा चित्रपट करताना मिळतो आहे. नाटकातील सर्व मंडळी असल्याने नाटकाचेच चित्रीकरण करतोय की काय असा काय असा भास होतोय मला.''

चित्रपटाच्या निर्मात्या मधुगंधा कुलकर्णी म्हणाल्या, ''आम्ही आत्तापर्यंत जेवढे चित्रपट केले त्यानिमित्ताने जेव्हा आम्ही लोकांना प्रीमियर किंवा इतर कार्यक्रमांच्या निमित्ताने भेटायचो तेव्हा लोक परेशला आवर्जून सांगायचे की, तुम्ही 'बोंबीलवाडी' नाटक परत आणा. माझेही हे आवडते नाटक आहे, कारण ती एक लाफ्टर राईड आहे. हळूहळू आम्ही जेव्हा याबाबत विचार करायला लागलो तेव्हा आम्हाला असे वाटायला लागले की, या नाटकावर चित्रपट का आणू नये? मग आम्ही ठरवले की या संकल्पनेचे चित्रपटीकरण करून त्याचा चित्रपट करायचा. त्यात आनंदाची बाब म्हणजे प्रशांत दामले यांनी हिटलरचे काम करायला हो म्हटल्यामुळे चित्रपटाचे मूल्य वाढले आहे. चित्रपट आपोआपच मोठा झाला. त्यांनी अप्रतिम काम केले आहे. यात प्रशांत दामले यांच्याबरोबरच वैभव मांगले, प्रणव रावराणे, मनमीत पेम, सुनील अभ्यंकर, गीतांजली कुलकर्णी, रितिका श्रोत्री, अद्वैत दादरकर हे कसलेले कलाकार आहेत, त्यामुळे एक चांगली भट्टी जमून आली आहे. त्यांचे अभिनय उत्तम झाले आहेत. ही एक धमाल लाफ्टर राईड झाली आहे.''

हिटलरच्या निवडीबाबत बोलताना लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी म्हणाले, ''आमचा हिटलर कसा असावा याबाबत चर्चा सुरु होती. हिटलर म्हणजे क्रूर, जगज्जेता, कठोर अशी त्याची प्रतिमा आहे. पण नाटकाचा फार्सिकल बाज पाहता, आमचा हिटलर 'क्युट' असावा अशी एक टूम निघाली. आता क्युट हिटलर कोण, असा प्रश्न आल्यावर महाराष्ट्रात क्युट म्हणून ज्याची ओळख आहे, असे एकाच नाव पुढे आले आणि ते म्हणजे प्रशांत दामले. नाटकामधून या कथेचे चित्रपटात रुपांतर होताना जे बदल झाले, मग त्यात वयोगट आला, आज त्या भूमिकेसाठी कोण योग्य आहे, याबद्दल चर्चा झाली. त्यातून मग कलाकारांची निवड झाली आणि ती चपखल आहे. त्यातून ही कलाकर मंडळी त्या त्या पात्रांमध्ये अगदी फिट्ट बसली आहेत, आणि ते तुम्ही पहालच.''

प्रशांत दामले यांनी हिटलर कसा दिला आहे, असे तुम्हाला वाटते, असे विचारले असता, मोकाशी म्हणाले, ''हा प्रश्न मला खरेतर खऱ्या हिटलर विचारावासा वाटतो, की 'काय रे तुझे जमले आहे का? तुला असे वगायाला जमेल का आयुष्यात.''

चित्रपटाचे निर्माते विवेक फिल्म्सचे श्री भरत शितोळे म्हणाले, ''फिल्म निर्मिती क्षेत्रात आलो आणि ठरवले की मराठी व हिंदी चित्रपट करायचे. पण नेमका कोणता चित्रपट करायचा वगैरे विचारात असताना परेशजी आणि मधुगंधाजींनी 'मु. पो. बोंबीलवाडी'चा विषय सांगितला. कथा ऐकताचक्षणी मला वाटले की, विवेक फिल्म्सनी या चित्रपटानेच सुरुवात करायला हवी. त्यानिमित्ताने विवेक फिल्म्स आणि मयसभा एकत्र आलो. आम्हाला परेश मोकाशी व मधुगंधाजी यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव खूप चांगला होता. बरेच काही शिकता आले त्यांच्याकडून. परेशजी हिटलरच्या भूमिकेमध्ये प्रशांत दामलेजीसाठी आग्रही होते. प्रशांत दामलेजी जेव्हा त्या गेटअप मध्ये आले तेव्हा वाटले की, परेशजींची व्हिजन बरोबर आहे. इतका परिपूर्ण आणि क्युट हिटलर दुसरा असूच शकत नाही. आम्ही यापुढेही एकत्र काम करत राहू.''

हा चित्रपट प्रेक्षकांनी का पहावा, असा प्रश्न विचारला असता मोकाशी यांनी मिश्कील उत्तर दिले आहे. ''आजकाल व्यायाम नीट होत नाही, त्यामुळे फुप्फुसानाही व्यायाम होत नाही. 'मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' एवढा हसवतो की त्यामुळे फुप्फुसांना खूप व्यायाम होतो. हे चित्रपट पाहण्याचे आरोग्यदायी कारण आहे.''

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

# मतदारांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व उपाययोजना करा-जिल्हाधिकारी यादव

## मतदान केंद्रांवरील सोयी सुविधांचा आढावा

मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मुंबई शहर जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी जिल्हा प्रशासनाची मा.भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अंमलबजावणी सुरु आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर सर्व मूलभूत सुविधा पुरविणे बंधनकारक आहे. जिल्हाधिकारी तथा अति. जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी मुंबई शहर जिल्ह्यातील मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील सुविधांचा आढावा घेतला.निवडणूक संबंधितसर्व अधिकारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्यामसुंदर सुरवसे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. यादव म्हणाले की, मा. भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर तसेच रॅम्पची व्यवस्था, रांगांमध्ये गर्दी झाल्यास मतदारांना बसण्यासाठी खुर्ची किंवा बाकडे, मोकळ्या ठिकाणी मतदान केंद्र असल्यास मंडपाची उभारणी,पंखे आदी निश्चित किमान सुविधा यादृष्टीने नियोजन करावे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व देखभाल दुरुस्त्या करुन घ्याव्यात. मतदान केंद्रावर ठळक अक्षरात येथील सुविधांचा फलक मतदार केंद्र क्रमांक, दिशादर्शक लावावेत. मा. आयोगाच्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जेष्ठ नागरिकांमध्ये ज्यांचे वय ८५ वर्षापेक्षा अधिक आहे असे नागरिक व दिव्यांग मतदार यांच्यासह निवडणूक कर्तव्यानिमित्त नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगाने कार्यपद्धती विहित करुन दिली आहे. या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कोणताही मतदार आपल्या हक्कापासून वंचित राहू नये, यादृष्टीने ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेले व दिव्यांग मतदारांना गृह मतदान करता येणार आहे. गृह मतदानासाठी नमुना १२-ड तत्काळ उपलब्ध करुन देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

मतदार नोंदणी झालेल्या प्रत्येक मतदाराला सुलभपणे मतदान करता यावे, यासाठी मतदार चिठ्ठ्यांचे वितरण करावे व नागरिकांना मतदान केंद्राविषयी माहिती उपलब्ध करुन द्यावी. ज्या मतदारांचा संपर्क होत नाही त्यांना दूरध्वनी, एसएमएस,व्हाट्सअप अशा माध्यमातून संपर्क करावा आणि मतदार केंद्राची माहिती दयावी. कोणत्याही प्रकारची मतदारांची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. असे आदेशही जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी यावेळी दिले.

जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी मुंबई शहर जिल्ह्यातील परिसरातील विविध मतदान केंद्रांना भेटी दरम्यान नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांना मतदान स्लीप मिळाली का? मतदान केंद्र कुठे आहे? याबाबत विचारणा केली. अनेक मतदारांनी जिल्हाधिकारी श्री.यादव यांच्याशी संवाद साधला मतदानदिवशीचा अनुभव सांगितला त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी तिथेच आवश्यक सूचना दिल्या. सर्व मतदान केंद्रांवरील संबंधित नोडल अधिकारी यांनामतदान जनजागृती उपक्रम विविध माध्यमातून राबवून मतदानांचा टक्का वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करा, असेही यावेळी सांगितले



आज दिवसभरात कुलाबा, मलबारहील, मुबांदेवी, वरळी, शिवडी आणि भायखळा या विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांना जिल्हाधिकारी यांनी भेट दिली.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांद्वारे संकल्पपत्र भरून द्यावे, यातील संदेशामध्ये त्यांच्या मतदान केंद्रांची माहिती द्यावी. लोकशाहीच्या मजबूतीकरणा सोबतच मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी सिस्टमॅटिक व्होटर्स एज्युकेशन ऍण्ड इलेक्ट्रोरल पारटींसिपेशन' (स्वीप) हा कार्यक्रम राबविण्यात यावा आणि शालेय विद्यार्थ्यांकडून संकल्पपत्र भरून घेऊन त्यांच्या पालकांना मतदानासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न करावा असेही जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी यावेळी सांगितले.

# क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी आदेश, सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे-जिल्हाधिकारी संजय यादव

मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी मुंबई शहर जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी आदेश व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी केले.

भायखळा येथील अण्णा भाऊ साठे सभागृहात क्षेत्रिय अधिकारी (झोनल ऑफिसर) यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या ठिकाणी श्री. यादव यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

श्री.यादव म्हणाले, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये तसेच सर्व क्षेत्रिय अधिकारी यांच्या कामात एकसूत्रीपणा राहावा यासाठी प्रशिक्षण आवश्यक असून सर्व अधिकाऱ्यांनी हे प्रशिक्षण लक्षपूर्वक घ्यावे. तसेच या प्रशिक्षणातून मतदान केंद्रावरील सर्व निवडणूक प्रक्रियेची माहिती समजून घेऊन त्याचा सूक्ष्मपणे अभ्यास करावा, अशा सूचना श्री.यादव यांनी यावेळी दिल्या.

ईव्हीएम तसेच व्हीव्हीपॅट आदी यंत्रणाबाबत सविस्तर माहिती घेऊन निवडणुकीचे महत्व समजून प्रत्येकाने दिलेली जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षणात महत्त्वपूर्ण सूचनांचे तंतोतंत पालन करावे. तसेच निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून देण्यात आलेले साहित्याचे वाचन करून प्रत्येक बाबीची सूक्ष्म माहिती घ्यावी, अशा सूचना श्री.यादव यांनी यावेळी दिल्या.

लोकशाही प्रक्रियेमध्ये निवडणूक आणि मतदान प्रक्रिया ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या प्रक्रियेमध्ये थेटपणे सहभागी होऊन आपली कर्तव्यभावना व लोकशाहीप्रती असणारी



निष्ठा अधोरेखित करत लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो, असे गौरवोद्गार श्री. यादव यांनी यावेळी काढले.

त्याचबरोबर प्रशिक्षणादरम्यान आपल्या मनात येणाऱ्या सर्व शंका व प्रश्न आपल्या प्रशिक्षकांना मनमोकळेपणाने विचारा आणि त्यांचे निराकरण करून घ्यावे. जेणेकरून आपले मतदानाविषयी कर्तव्य अधिकाधिक योग्य प्रकारे पार पाडता येईल,असेही श्री. यादव यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधताना आवर्जून नमूद केले. या संवादादरम्यान, जिल्हाधिकारी श्री.यादव यांनी प्रशिक्षणार्थींना सांगितले की, आपल्यापैकी काही कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही निवडणूक कार्यात सहभाग नोंदविला असेल, तर काही कर्मचाऱ्यांची ही पहिलीच वेळ असेल. मात्र, सर्वांनीच ही त्यांची पहिलीच निवडणूक ड्युटी' आहे, असे समजून प्रशिक्षणादरम्यान सांगण्यात येणाऱ्या सर्व बाबी व सूचना अत्यंत लक्षपूर्वक समजावून घ्याव्यात व त्याबाबी काम करताना काटेकोरपणे अंमलात आणाव्यात. यावेळी नोडल ऑफिसर (प्रशिक्षण) अजित देशमुख यांनी उपस्थित सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया अत्यंत सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व बाबींची अत्यंत सविस्तर व प्रात्यक्षिके दाखवून प्रशिक्षण दिले.

## अवैध मार्गाने होणाऱ्या दारु वाहतुकीवर जिल्हा प्रशासनाची करडी नजर

रायगड दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निपक्ष, शांततापूर्ण आणि प्रलोभनमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी जिल्ह्याच्या रस्ते आणि सागरी सीमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच अवैध मार्गाने होणाऱ्या दारू वाहतुकीवर देखील करडी नजर ठेवण्याचा निर्णय आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सीमेलगतच्या जिल्हा क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, सोलापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे, पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, पुणे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, सातारा पोलीस अधिक्षक समीर शेख यांसह राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत प्रामुख्याने कायदा आणि सुव्यवस्था, बेकायदेशीर मार्गाने होणारी सर्व प्रकारची वाहतूक रोखणे, जप्ती याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव पाडू शकणाऱ्या सीमावर्ती भागातील संवेदनशील ठिकाणे ओळखून त्याठिकाणी प्रतिबंध करण्यासाठी तपासणी नाके असणार आहेत. या माध्यमातून सर्व हालचालीवर देखरेख ठेवण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून अंमली पदार्थ, दारू, शस्त्रे आणि स्फोटकांसह प्रतिबंधित वस्तूंच्या हालचालींना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. जिल्हा सीमेवरून होणारे दारू आणि रोकड वाहतुकीची निर्गमन आणि प्रवेश स्थाने ओळखून त्यावर सर्व संबंधित जिल्हा पथकाने योग्य ती कारवाई करावी असे या बैठकीत सर्वानुमते ठरले.

## निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी केले मार्गदर्शन



मुंबई दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत सर्वच २६ विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात निवडणूकविषयक प्रशिक्षण कार्यक्रम वेगात सुरु आहेत. १५८-जोगेश्वरी, १६७- विलेपार्ले व १६८ चांदिवली विधानसभा मतदारसंघ क्षेत्र अंतर्गत विभागीय अधिकारी व अन्य अधिकारी यांच्यासाठी निवडणूक कामकाज विषयक व 'ईव्हीएम' संदर्भातील प्रथम प्रशिक्षण मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे झाले.

१७३- चेंबूर आणि १६७- विलेपार्ले विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील प्रशिक्षण कार्यक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अतिरिक्त जिल्हाधिकारी मनोज गोहाड हे उपस्थित होते.

१६७- विलेपार्ले विधानसभा मतदारसंघ क्षेत्र अंतर्गत निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास ६७२ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते तर २०६ जण गैरहजर होते अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली आहे.

मतदान केंद्र अध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी, व इतर मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण यावेळी झाले. यावेळी हॅण्डस ऑन ट्रेनिंगची देखील व्यवस्था करण्यात आली होती अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली आहे.

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत विधानसभा निवडणूक २०२४ साठी जे नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनी निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास तात्काळ हजर राहण्याचे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिले आहेत.

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत विधानसभा निवडणूक २०२४ साठी जे नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर राहिले त्यांची माहिती संकलित करण्यात येत असून गैरहजर अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही श्री क्षीरसागर यांनी सांगितले आहे.मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत विधानसभा निवडणूक २०२४ साठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवडणूकविषयक विविध प्रकारच्या कामकाजासंदर्भातील सर्व प्रशिक्षणांना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.यासंदर्भातील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यावी असे आदेश निवडणूक शाखेमार्फत निर्गमित करण्यात आले आहेत.

## निवडणूक जबाबदारी आदेशाचे पालन न केल्यास कठोर कारवाई-जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर

नागपूर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा निवडणुकीच्या कामांना गती देण्यात आली असून यात प्राथमिक टप्प्यात वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ज्यांचे वय आहे अशा ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांग मतदार असलेल्या मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. ही जबाबदारी सोपविण्यात आलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांनी अधिकृत कर्तव्याचे पालन न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध लेखी तक्रार दाखल झाली. या तक्रारीअन्वये सावनेर येथील पोलीस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावनेरचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रविंद्र होळी यांनी पो. स्टे. सावनेर येथे सदर तक्रार दाखल केली. नगरपरिषदेची सुभाष प्राथमिक शाळा, सावनेर येथील सहाय्यक शिक्षक जयप्रकाश जगरामजी हेडाऊ यांची यादी भाग क्रमांक १३५



करीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. या क्षेत्राचे तलाठी तथा पर्यवेक्षक यांनी १२ ड फॉर्म भरून घेण्यास सांगितले असता हेडाऊ यांनी सदर काम करण्यास स्पष्ट नकार दिला. आदेश घेण्यास त्यांनी नकार दिला. अरेरावीचे असभ्य वर्तणूक केली. यामुळे ही तक्रार दाखल करण्यात आली होती. निवडणूक कामाच्या आदेशाचे पालन करण्याच्या त्यांना वारंवार सूचना देवून त्यांनी आपल्या कर्तव्यात टाळाटाळ केली. याबाबत उपविभागीय अधिकारी संपत खलाटे यांनी समज देवून पाहिली. त्यांना वाजवी संधी देवूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचे खलाटे यांनी सांगितले.

निवडणूक जबाबदारी आदेशाचे पालन न केल्यास कठोर कारवाई निवडणूक विभागातर्फे सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी ही राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे. याच बरोबर कोणताही शासकीय कर्मचारी हा राजकीय प्रचारात सहभागी होता कामा नये. याबाबत निवडणूक विभागामार्फत स्वयंस्पष्ट आदेश निर्गमित केले आहेत. आपली जबाबदारी टाळण्यासाठी कोणीही आदेश रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास नियमानुसार कारवाई अटळ असल्याचा इशारा जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी दिला.

## विधानसभा निवडणूक पूर्वपीठिकेचे मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते प्रकाशन

### माध्यमांना निवडणूक विषयक संदर्भासाठी पुस्तिका उपयुक्त- मुख्य सचिव

शिर्डी दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आहिल्यानगर जिल्हा निवडणूक प्रशासनाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या निवडणूक पूर्वपीठिकेचे प्रकाशन राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते शिर्डी येथे करण्यात आले. माध्यम प्रतिनिधींना निवडणूक विषयक संदर्भासाठी पुस्तिका उपयुक्त असल्याचे श्रीमती सौनिक यावेळी म्हणाल्या.

याप्रसंगी महारेराचे अध्यक्ष मनोज सौनिक, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक दत्तात्रय पडसलगीकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर आदी उपस्थित होते.

आहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयाने माध्यम प्रतिनिधींच्या सुलभ संदर्भासाठी या पुस्तिकेची निर्मिती केली आहे. निवडणूक आचारसंहितेबाबत तरतुदी, निवडणूक वार्तांकनासाठी प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्त्वे, न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल स्टँडर्डस् ऑथॉरिटीच्या (एनबीडीएसए) मार्गदर्शक सूचना, इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशन ऑफ इंडियाची (आयएमएआय) स्वैच्छिक आचारसंहिता आदींबाबत सविस्तर माहिती या पुस्तिकेत दिली आहे.

राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीचे कामकाज (एमसीएमसी), पेड न्यूजबाबत तरतुदी आदी उपयुक्त माहितीही या पुस्तिकेत आहे.

सन १९५१ च्या निवडणुकीपासून २०१९ च्या निवडणुकीपर्यंत जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघातील उमेदवार त्यांना झालेले मतदान, मतदार संख्या, वैध मतांची संख्या, मतदानाची टक्केवारी यांचाही पुस्तिकेत समावेश असल्याने ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींना संदर्भासाठी उपयुक्त आहे. माध्यमांच्या माहितीसाठी जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांचे समन्वय अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक, मतदार मदत कक्ष, जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष यांचे दूरध्वनी क्रमांक, आयोगाच्या विविध तंत्रज्ञान सहाय्यित उपयोजक (ॲप), पोर्टल आदींची माहितीही यात देण्यात आली आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल उस्मानाबाद मध्ये जगातील अव्वल फ्रीस्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईटची कार्यशाळा संपन्न

उस्मानाबाद दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पोदार इंटरनॅशनल स्कूल उस्मानाबाद तर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रित करण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी उस्मानाबाद प्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून त्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनवणे होते.

जेमी फुटबॉलवरील त्याच्या जबरदस्त नियंत्रणासाठी ओळखला जातो आणि त्याने जगभरात प्रवास केला आहे, प्रसिद्ध जागतिक ब्रँड्सशी सहयोग केला आहे. २०१७ आणि २०१८ मध्ये बॅक-टू-बॅक यूईएफए चॅम्पियन्स लीग फायनलमध्ये खेळपट्टीवर कामगिरी केली आहे. त्याच्या सातत्य आणि सूक्ष्म अंमलबजावणीमुळे त्याला जगप्रसिद्ध फुटबॉलपटूंकडून तसेच चाहत्यांकडून खूप प्रेम मिळाले आहे. जेमीच्या अनन्य साधारण कृतींमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते.

जेमीचा ठाम विश्वास आहे की फ्रीस्टाइल फुटबॉल शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित करण्यात मदत करते आणि वाढीच्या मानसिकतेचे महत्त्व शिकवते. यामुळे पोदार एज्युकेशन नेटवर्कचा सर्वांगीण शिक्षणाला भक्कम पाठिंबा मिळतो.

यावेळी बोलताना जेमी नाईट म्हणाले, "पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल इतका उत्साह, प्रतिभा आणि आवड आहे हे पाहून खूप आनंद झाला. भारत फुटबॉल खेळात जागतिक खेळाडू बनू शकतो आणि कदाचित फुटबॉल विश्वचषकात लवकरच भाग घेईल अशी मी अशा बाळगतो. मला इथे यायला खूप आवडले आणि आशा आहे की मी लवकरच परत येईन ."

पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक श्री हर्ष पोदार यांनी विद्यार्थ्यांच्या उर्जा आणि उत्कटतेबद्दल आनंद व्यक्त केला. "जेमी ने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाविषयी फोकस ठेवणे महत्वाचे आहे हे लक्षात आले. "ग्रेड्सपेक्षा जास्त" या आमच्या विश्वासावर ठाम राहून, आमच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेतून शिकलेल्या गोष्टींचे अनुकरण करावे अशी आमची इच्छा आहे मग ती शैक्षणिक असो किंवा गैर-शैक्षणिक असो. आम्हाला आशा आहे की आमच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सुरुवातीच्या काळात अशा रोमांचक संधी त्यांना अखेरीस सर्वात मोठ्या टप्प्यावर देशाचे प्रतिनिधित्व करण्यास मदत करतात."

पोदार एज्युकेशन नेटवर्क बद्दल थोडेसे:- पोदार एज्युकेशन नेटवर्कची स्थापना शेठ आनंदीलाल पोदार यांनी १९२७ मध्ये केली होती, अगदी सुरुवातीपासूनच, प्रामाणिकपणा, सचोटी आणि सेवा या पारंपारिक भारतीय मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आणि प्रेरित केले गेले. राष्ट्रपिता महात्मा गांधी हे आनंदीलाल पोदार ट्रस्टचे पहिले अध्यक्ष म्हणून या बांधिलकीची साक्ष देतात. शिक्षण क्षेत्रातील ९७ वर्षांहून अधिक अनुभवांसह, पोदार एज्युकेशन नेटवर्क आता १४९ पोदार इंटरनॅशनल स्कूल्सचे नेटवर्क आहे, जे २,५०,००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या पोदार एज्युकेशन नेटवर्कद्वारे पूर्णपणे व्यवस्थापित केले जाते.

# जगातील अव्वल फ्रीस्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईट ची कार्यशाळा संपन्न

लातूर/औसा दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पोदार इंटरनॅशनल स्कूललातूरआणि औसा तर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रितकरण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी लातूरप्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिकफुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणूनत्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यातखेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षमबनवणे होते.

जेमी फुटबॉलवरील त्याच्याजबरदस्त नियंत्रणासाठी ओळखला जातो आणि त्याने जगभरात प्रवास केला आहे, प्रसिद्ध जागतिक ब्रँड्सशी सहयोग केला आहे. २०१७ आणि २०१८ मध्ये बॅक-टू-बॅक यूईएफए चॅम्पियन्स लीगफायनलमध्ये खेळपट्टीवर कामगिरी केली आहे. त्याच्या सातत्य आणि सूक्ष्म अंमलबजावणीमुळेत्याला जगप्रसिद्ध फुटबॉलपटूंकडून तसेच चाहत्यांकडून खूप प्रेम मिळाले आहे. जेमीच्या अनन्य साधारण कृतींमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झालेहोते. जेमीचा ठाम विश्वास आहेकी फ्रीस्टाइल फुटबॉल शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित करण्यात मदत करते आणि वाढीच्यामानसिकतेचे महत्त्व शिकवते. यामुळे पोदार एज्युकेशन नेटवर्कचा सर्वांगीण शिक्षणालाभक्कम पाठिंबा मिळतो.

यावेळी बोलताना जेमीनाईट म्हणाले, "पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल इतका उत्साह,प्रतिभा आणि आवड आहे हे पाहून खूप आनंद झाला. भारत फुटबॉल खेळात जागतिक खेळाडू बनूशकतो आणि कदाचित फुटबॉल विश्वचषकात लवकरच भाग घेईल अशी मी अशा बाळगतो. मला इथे यायलाखूप आवडले आणि आशा आहे की मी लवकरच परत येईन ."पोदार एज्युकेशन नेटवर्कचेसंचालक श्री हर्ष पोदार यांनी विद्यार्थ्यांच्या उर्जा आणि उत्कटतेबद्दल आनंद व्यक्त केला. "जेमी ने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाविषयीफोकस ठेवणे महत्वाचे आहे हे लक्षात आले. "ग्रेड्सपेक्षा जास्त" या आमच्याविश्वासावर ठाम राहून, आमच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेतून शिकलेल्या गोष्टींचेअनुकरण करावे अशी आमची इच्छा आहे मग ती शैक्षणिक असो किंवा गैर-शैक्षणिक असो. आम्हालाआशा आहे की आमच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सुरुवातीच्या काळात अशा रोमांचक संधीत्यांना अखेरीस सर्वात मोठ्या टप्प्यावर देशाचे प्रतिनिधित्व करण्यास मदत करतात."पोदार एज्युकेशन नेटवर्कबद्दल थोडेसे:- पोदार एज्युकेशन नेटवर्कची स्थापना शेठ आनंदीलाल पोदार यांनी १९२७ मध्ये केली होती, अगदी सुरुवातीपासूनच, प्रामाणिकपणा,सचोटी आणि सेवा या पारंपारिक भारतीय मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आणि प्रेरित केलेगेले. राष्ट्रपिता महात्मा गांधी हे आनंदीलाल पोदार ट्रस्टचे पहिले अध्यक्ष म्हणूनया बांधिलकीची साक्ष देतात.शिक्षण क्षेत्रातील ९७वर्षांहून अधिक अनुभवांसह, पोदार एज्युकेशन नेटवर्क आता १४९ पोदार इंटरनॅशनल स्कूल्सचे नेटवर्क आहे, जे २,५०,०००पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या पोदार एज्युकेशन नेटवर्कद्वारे पूर्णपणे व्यवस्थापितकेले जाते.

# मेट्रो कॅश अँड कॅरी भारतात दोन दशके साजरी करत आहे: भव्य 'मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग' विशेष

नाशिक दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मेट्रो कॅश अँड कॅरी, भारतातील आघाडीच्या संघटित घाऊक विक्रेते आणि खाद्य विशेषज्ञ, भारतातील यशस्वी ऑपरेशन्सच्या २१ व्या वर्षाचे स्मरण करताना, २१ व्या सणाच्या भेटवस्तू ऑफरची मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग लहान आणि स्वतंत्र व्यवसायांसाठी मेट्रो भारतातील घाऊक दुकाने सुरुवात केली आहे-

मेट्रो इंडियाचे ३ दशलक्षाहून अधिक लहान आणि स्वतंत्र व्यावसायिक ग्राहक १ ऑक्टोबरपासून अधिकृतपणे सुरू झालेल्या आणि ३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत चालणाऱ्या ३५ दिवसांच्या उत्सवात विशेष सणाच्या भेटवस्तू ऑफरचा लाभ घेऊ शकतात. मेट्रो घाऊक दुकानांव्यतिरिक्त, विशेष भेटवस्तू ऑफर आणि डील मेट्रोच्या वेबसाइट वर ऍक्सेस केले जाऊ शकतात आणि मेट्रो घाऊक ॲपवर देखील उपलब्ध केले गेले आहेत आहे.

हा अनोखा उपक्रम स्पर्धात्मक घाऊक किमतींवर उत्पादनांची विस्तृत श्रेणी ऑफर करतो, ज्यामुळे व्यवसायांना आकर्षक डील आणि बचत त्यांच्या ग्राहकांना करता येते. मेट्रोसह, लहान व्यवसाय त्यांच्या सर्व भेटवस्तू गरजा शोधू शकतात, लोकप्रिय ब्रँडपासून ते अद्वितीय शोधांपर्यंत, सर्व एकाच छताखाली उपलब्ध असणार आहेत.

मेट्रो इंडिया लहान किरकोळ विक्रेते आणि व्यवसायांना पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे. त्यांना सणासुदीच्या हंगामाचा अधिकाधिक लाभ घेता यावा यासाठी, मेट्रो सुका मेवा, मिठाई, चॉकलेट, ज्यूस, मिठाई, स्नॅक्स, होम डेकोर, कापड, फर्निशिंग, घरगुती वस्तू, स्वयंपाकघरातील वस्तू, उपकरणे, सामान यासह भेटवस्तूंच्या विस्तृत पर्यायांची ऑफर देत आहे. मेट्रो चे स्वतःचे ब्रँड, फाइन लाइफ आणि टॅरिंग्टन हाऊस, देखील आकर्षक सवलती देणार आहेत. सणासुदीच्या संपूर्ण कालावधीत, ग्राहक विविध श्रेणींमधील उत्पादनांवर विशेष सवलती आणि ऑफरचा आनंद घेऊ शकतात.

२००३ मध्ये स्थापन झाल्यापासून, मेट्रो इंडियाने एक मजबूत ब्रँड इक्विटी तयार केली आहे आणि भारतातील किराणा, एमएसएमई आणि इतर लहान व्यवसाय आणि व्यापाऱ्यांसाठी एक विश्वासू भागीदार म्हणून स्वतःची स्थापना केली आहे. स्वतंत्र व्यवसायासाठी चॅम्पियन म्हणून, मेट्रो नेहमी उद्योजकीय इको-सिस्टमला पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे; मेट्रोने विकली जाणारी ९९% उत्पादने ही सर्व स्थानिक पातळीवर एमएसएमई आणि स्थानिक पुरवठादारांकडून घेतली जातात.

या स्वतंत्र व्यवसायांना समृद्ध करण्यात मेट्रो आघाडीवर आहे आणि स्मार्ट किराणा कार्यक्रमाद्वारे किराणा इकोसिस्टमला सशक्त करण्यात प्रचंड अभिमान आहे. अशा प्रकारचा पहिला उपक्रम, हा कार्यक्रम पारंपारिक आई आणि पॉप किराणा स्टोअर्सना आधुनिकीकरण आणि डिजिटलायझेशन सोल्यूशन्ससह नवीन युगाच्या रिटेल व्यावसायिक स्पर्धा करण्यासाठी मदत करतो.

# विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्सची नागपुरात नवीन शाळा सुरु, केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते कॅम्पसचे लोकार्पण

नागपुर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पूर्व विदर्भ महिला परिषद आणि विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्स यांनी नागपुरात काळे फाउंडेशन ट्रस्टच्या सहकार्याने विबग्योर अकॅडमी नागपूर कॅम्पस ची सुरुवात केली असून, आज हा लोकार्पण सोहळा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी काळे फाउंडेशन ट्रस्टचे श्री विलास काळे आणि श्री प्रवीण काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विबग्योर ग्रुपचे अभिनंदन करून अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मुलांमध्ये संशोधनगुण आणि नैपुण्य वाढीस लागावे अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच इथून निघणारे विद्यार्थी हे समाजाच्या विकासात भर घालतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी काळे कुटुंबीयांचा देखील कौतुक केलं.

यावेळी विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्स संस्थापक चेअरमन रुस्तम केरावाला यांनी नागपुरात पहिल्या आंतरराष्ट्रीय शाळेच्या लॉन्च बद्दल आनंद व्यक्त करून केंब्रिज इंटरनॅशनल अभ्यासक्रम या ठिकाणी शिकवण्यात येणार असल्याचे सांगितले. मुलांना भविष्यासाठी तयार करू हे आश्वासन देत वेबग्यावर ग्रुप ऑफ स्कूल्सच्या व्हाईस चेअर पर्सन कविता केरावाला यांनी हे नवीन कॅम्पस एकूणच मुलांचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी तयार करण्यात आल्याचे सांगितले

ही नवीन शाळा नागपूरच्या मध्यभागी, सीताबर्डी मेट्रो नजीक, स्थित असून या ठिकाणी वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून केंब्रिज अभ्यासक्रम उपलब्ध आहे. या ग्रुपच्या शाळा देशभरात विविध ठिकाणी असून नागपूर कॅम्पसमुळे आता एकूण शाळांची संख्या ३९ इतकी झाली आहे. या ठिकाणी मुलांना अत्याधुनिक सोयीसुविधांसह, आधुनिक प्रयोगशाळा मल्टीमीडिया वर्ग आणि विविध क्रीडा सुविधा एकाच ठिकाणी मिळणार आहे. मुलांमधील बौद्धिक वाढवण्यासोबतच त्यांची कल्पनाशक्ती आणि नेतृत्वगुण वाढवण्यावर देखील या ठिकाणी भर देण्यात येणार आहे.

## पान १ वरुन

### लडाखमध्ये गस्तीच्या नवीन...

चीनसोबत भारताची परिस्थिती स्थिर आहे, परंतु ती सामान्य नाही, ती खूपच संवेदनशील आहे. आपल्याला लढावे लागेल, सहकार्य करावे लागेल, एकत्र राहावे लागेल, चीनला सामोरे जावे लागेल आणि आव्हान द्यावे लागेल. ते म्हणाले होते की, एप्रिलपासून भारत आणि चीनमध्ये १७ कमांडर स्तरावरील बैठका झाल्या आहेत. या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली.

### संभाजीराजेंच्या तिसऱ्या आघाडीचे....

कोणताही पायाभर आराखडा आपल्याकडे नाही, म्हणून परिवर्तन महाशक्तीची निर्मिती झाल्याचं आमदार बच्चू कडू यांनी म्हटलं. तसेच, परिवर्तन महाशक्ती आघाडीला चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या असून आज आम्ही महाशक्तीचे उमेदवार जाहीर करत असल्याचे सांगत आमदार बच्चू कडू यांनी स्वत:ची उमेदवारी जाहीर केली. परिवर्तन महाशक्ती वैचारिक परिवर्तन आहे, आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. तर, महायुतीतील एक जण बाहेर जाण्याची शक्यता आहे, असा दावाही आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. आम्हाला आतापर्यंत ६२ संघटनांनी पाठिंबा दिला आहे. त्यामध्ये, रयत शेतकरी संघटनेने देखील पाठिंबा दिलाय, पण ही संघटना सदाभाऊ खोत यांची नाही, ते आमच्यासोबत आले तरी त्यांना आम्ही घेणार नाही, असेही कडू यांनी स्पष्ट केले. दरम्यान, भाजपने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून अचलपूर मतदारसंघातून प्रवीण तायडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, सांगली जिल्ह्यातील शिरोळ व मिरज या दोन मतदारसंघात राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार उद्या जाहीर करण्यात येणार आहेत.

### ऊसतोड कामगार संघटनेचं महायुतीला...

आष्टी, चाळीसगाव, कन्नड आणि माजलगाव या विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे केले जाणार आहे. याबाबत महायुती आणि महाविकास आघाडीकडे बोलणी झाली असून यांच्याकडून उमेदवारी न मिळाल्यास या मतदारसंघात अपक्ष लढण्याची तयारी ऊसतोड कामगार संघटनांनी केलीय. यात ९ ऊसतोड कामगार संघटनांचा समावेश आहे..

बीड जिल्ह्यात महायुतीकडून दोन जागेवर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार असतील आणि चार जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार असतील. बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघ आणि केज विधानसभा मतदारसंघ मधून भाजपचे उमेदवार महायुतीकडून निवडणूक लढवतील. तर, अजित पवार गटाकडून बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे चार उमेदवार असतील माजलगाव विधानसभा मतदारसंघ गेवराई विधानसभा मतदारसंघ परळी विधानसभा मतदारसंघ आणि बीड विधानसभा मतदारसंघ या ठिकाणी अजित पवार गटाचे उमेदवार पाहायला मिळतील.

### ५०० रुपयांचे बाँड घेऊन उमेदवार...

५०० रुपयांचा बाँड घेऊन लिहून देतोय. मराठ्यांचं मतदान आहे, म्हणून तुम्ही उगाच बाँड लिहित बसायचं असं करु नका. अगोदर आमच्याशी संपर्क करा, किंवा येऊन भेटा. जिथं आम्ही उमेदवार देणार नाहीत, तिथं कुठल्या पक्षाचा असेल किंवा अपक्ष उमेदवार असेल त्याचे मेरीट आम्ही तपासणार आहोत. समजा एखाद्याने आम्हाला बाँडवर लिहून दिलं नाही तर त्या मतदारसंघातील अपक्ष किंवा तिसऱ्या क्रमांकाच्या उमेदवाराला आम्ही पाठिंबा जाहीर करू, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले.

मराठ्यांचं मतदान फिक्स आहे, पण तू काय केलंय लोकांसाठी, तूझं मतदार किती आहे, तुझं काम काय आहे हेही पाहिलं जाणार आहे. केवळ मराठ्यांचं मतदान मिळतंय म्हणून बाँडवर लिहून देतोय, हे चालणार नाही. आमच्याकडे डायरेक्ट बाँडवर लिहून आणून देऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे, राज्यातील विविध मतदारसंघातील पक्षाच्या उमेदवारांनी बाँडवर लिहून देण्यापूर्वी जरांगे पाटील यांची भेट घेणे अपक्षित आहे.

मराठवाड्यात जरांगे पाटील यांचा फॅक्टरचा प्रभाव कमी करण्यासाठी भाजपाने मराठवाड्यातून सर्वाधिक मराठा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत. मराठवाड्यात भाजपने पहिल्याच यादीत १६ उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यात तीन मतदारसंघ राखीव आहेत, १३ खुल्या मतदारसंघातुन मराठवाड्यात दहा मराठा समाजाचे उमेदवार भाजपने दिले आहेत. तर, औरंगाबाद पूर्व मतदार संघातून अतुल सावे आणि तुषार राठोड हे दोन ओबीसी चेहरे दिले आहे. तसेच, प्रशांत बंब यांच्यारुपाने जैन समाजाच्या चेहरा गंगापूर मतदारसंघातून निवडणुकीत उतरवला आहे.

जालना जिल्ह्यातील बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे इच्छुक आणि शिवसेना उबाठाचे माजी आमदार संतोष सांबरे यांनी आज मनोज जरांगे यांची भेट घेतली. जालन्यातील बदनापूर मतदारसंघ एससी जागेसाठी आरक्षित असून काल मनोज जरांगे यांनी आरक्षित जागेवर उमेदवार देणार नसल्याचे जाहीर केल्यानंतर संतोष सांबरे यांनी भेट घेऊन जरांगेंचे आभार मानले आहेत.

### अजित पवार गटाकडून एबी फॉर्म...

विविध चर्चांना उधाण आले आहे. भरत गावित यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक भाजपकडून लढवली होती. त्यावेळी त्यांचा काँग्रेसचे शिरीष कुमार नाईक यांनी पराभव केला होता. आता भरत गावित यंदाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून लढणार आहेत.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांची घोषझा झाली असून २२ ऑक्टोबर रोजी अधिसूचना जारी होणार आहे. त्यानंतर नामांकन दाखल करण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर असणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख जवळ येत असल्यामुळे अजित पवार यांनी ए बी फॉर्मचे वाटप सुरू केल्याचे दिसत आहे. अजित पवार यांच्या मुंबईतील देवगिरी निवासस्थानी विद्यमान आमदार एबी फॉर्म घेऊन जात आहेत. यावेळी संजय बनसोडे, चेजन तुपे, सुनील तटकरे आदी उपस्थित होते. या सर्व हालचालींवरून अजितपवार गटाची पहिली यादी आज जाहीर होणार असल्याने संकेत मिळत आहेत.

### भाजपसोबत युती म्हणजे....

करणार नाही. भाजपशी हात मिळवणी करणे म्हणजे औरंगजेब आणि अफजल खानाशी हात मिळवणी करणे.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, जागा वाटपाचा विषय पूर्णपणे वेगळा आहे. अफवा पसरवल्या जातात, हा विषय वेगळा आहे. आमचं मन साफ आहे. आमचा विचार स्वच्छ आहे. आम्हाला जे करायचंय ते आम्ही छाती ठोकपणे करु. आमच्या २१० जागा संपूर्ण चर्चेअंती मोकळ्या झालेल्या आहेत. आमची भूमिका आहे, महाराष्ट्रात आम्ही एकत्र राहायला पाहिजेत. महाराष्ट्रावर चालून येणाऱ्या लोकांचा पराभव आम्ही करणार आहोत.

आमची लढाई महाराष्ट्राच्या शत्रूंविरोधात सुरु आहे. महाराष्ट्राला लुटणाऱ्यांविरोधात आम्ही लढत आहोत. शिवसेना अशा शक्तींविरोधात कधीही झुकणार नाही. ज्यांना देशाचं संविधान संपवायचं आहे. जे लोक महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवतात, त्यांच्याविरोधात आमचा लढा आहे, असंही संजय राऊत यांनी सांगितलं.

### हिंदुत्व शब्द बदलण्याची मागणी....

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे.बी.पारदीवाला आणि न्यायमूर्ती ननोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्याच्या युक्तिवादावर सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली. तसेच सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे.बी.पारदीवाला आणि न्यायमूर्ती मिश्रा यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. यावेळी न्यायालयाने महत्वाची टिप्पणी केली.

यावेळी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी म्हटलं की, "हा प्रक्रियेचा पूर्ण दुरुपयोग आहे. आम्ही त्यावर विचार करणार नाही", असं सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी म्हटलं. दरम्यान, यासंदर्भातील वृत्त लाइव्ह लॉच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, दिल्लीतील विकासपुरी येथील रहिवासी एसएन कुंद्रा यांनी ही जनहित याचिका दाखल केली होती. मात्र, त्यांचं म्हणणं ऐकून घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला.

### मनोज जरांगेंनी शरद पवारांच्या...

त्यांना मागील आठवडयात कोण - कोण भेटले हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी जनतेला वेड्यात काढून दोन समाजात तेढ निर्माण करु नये. ज्या व्यक्तींनी जरांगे यांना भेटून पाठिंबा दिला, त्यांना नावानिशी निवडणुकीत ओबीसी मतदान करणार नाही. आमची भूमिका स्पष्ट असून जे ओबीसी समाजाचे उमेदवार असतील त्यांना आम्ही पाठिंबा देणार. ओबीसी समाजाची माणसे विधीमंडळात गेली पाहिजे.

एखादी जत्रा भरवणे सोपे असते, पण कोणत्या पक्षाला, नेत्याला शिव्या देऊन निवडणूक जिंकता येत नाही हे जरांगे यांना समजले पाहिजे. त्यांनी मुख्यमंत्री होऊन समाजाचे प्रश्न सोडवावेत. जरांगे यांच्या भूमिकेची आम्ही वाट पाहत आहोत. दलित, मुस्लिम समाजाच्या मतांसाठी मनोज जरांगे पुढाकार घेऊन शरद पवारांना निवडणुकीत मदत करणार हे दिसून येत आहे, असेही लक्ष्मण हाके यावेळी बोलताना म्हणाले.

### गौरी लंकेश हत्या प्रकरणातील....

आला आहे. श्रीकांत पांगरकर हा मूळ जालना जिल्ह्यातील आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर श्रीकांत पांगरकरने दावा केला आहे की, 'आपण पक्ष कधीही सोडलेला नाही आणि पक्षात अनेक पदांवर काम केलेलं आहे. २०१४ सालापासून मी मला आता सोपवण्यात आलेली भूमिका सांभाळत आहे', असं श्रीकांत पांगरकरने इंडियन एक्सप्रेसशी प्रतिक्रिया देताना म्हटलं. दरम्यान, २०११ ते २०१८ या काळात श्रीकांत पांगरकर सक्रिय नसले तरी खोतकरांचे समर्थक होते, असं आता सूत्रांनी सांगितलं आहे. पक्षातील अंतर्गत सूत्रांच्या म्हणण्यानुसार, कर्नाटक एसआयटीने ऑगस्ट २०१८ मध्ये श्रीकांत पांगारकरला अटक केल्यानंतर खोतकर हे त्याच्यापासून बाजूला झाले होते.

दरम्यान, माजी नगरसेवक जगन्नाथ यांचे पुत्र श्रीकांत पांगारकरने १९९६ मध्ये राजकीय प्रवास सुरू केला आणि पुढे शाखाप्रमुख आणि विभागप्रमुख पदीही काम केलं. २००१ मध्ये पांगारकरने जालन्यातून पहिली निवडणूक जिंकली होती, तसेच २०११ मध्ये हिंदू जनजागृती समिती या संघटनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. तसेच जालना शहरातील त्याची मजबूत हिंदुत्ववादी प्रतिमा आणि दबदबा यामुळे शिवसेनेची (शिंदे) मते एकवटण्यास मदत होईल, या आपेक्षने आता निवड करण्यात आली असावी, असं पक्षातील काही सूत्रांनी सांगितलं.

ज्येष्ठ पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणात श्रीकांत पांगारकरवर प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राहून बंदुकांची व्यवस्था केल्याचा आरोप आहे. तसेच तो नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरणातही आरोपी आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने त्याच्यासह इतर ११ जणांवर कट रचल्याचा आरोप आहे. मात्र, हे सर्व आरोप श्रीकांत पांगारकरने फेटाळून लावले आहेत आणि असा दावा केला आहे की, "राजकीय षडयंत्रामुळे आपल्याला फसवण्यात आलं आहे. गौरी लंकेश हत्या प्रकरणात गेल्या महिन्यात जामीन मंजूर झाला त्यामुळे आता जामिनावर बाहेर आहे. पण जर तुम्ही या प्रकरणातील आरोपपत्र वाचले तर तुमच्या लक्षात येईल की, माझ्याविरुद्ध कोणताही पुरावा नाही. सर्व आरोप खोटे आहेत. मी माझ्या आयुष्यातील सहा वर्षे गमावली. मी गुन्हेगार नाही आणि दोन्ही प्रकरणांमध्ये माझी कोणतीही भूमिका नाही. मी फक्त राजकारणात सक्रिय होतो", असं श्रीकांत पांगारकरने म्हटलं आहे. दरम्यान, स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, पांगारकर आता छत्रपती संभाजीनगरमध्ये राहत असून तेथे हॉटेल आणि रिअल इस्टेट व्यवसाय चालवत आहे.

# लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर मिडटाऊनने मिडटाऊन लायन्स मेडिकल सर्व्हिसेस ट्रस्टच्या माध्यमातून ११ वर्षे सेवा साजरी

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर मिडटाऊनला मिडटाऊन लायन्स मेडिकल सर्व्हिसेस ट्रस्टचा ११ वा वर्धापनदिन जाहीर करताना अभिमान वाटतो, जो या भागातील किडनी रुग्णांसाठी आशेचा किरण आहे. २०१३ मध्ये त्याची स्थापना झाल्यापासून, किडनी डायलिसिस सेंटर गरजूंना परवडणारी आणि सुलभ आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी समर्पित आहे, विशेष लक्ष वंचित रुग्णांना आधार देण्यावर आहे.

गेल्या ११ वर्षांत, केंद्राने १५,००० हून अधिक डायलिसिस रुग्णांना सेवा दिली आहे, अनेकांना मोफत उपचार मिळत आहेत. आरोग्यसेवा सुलभ करण्याच्या आमच्या वचनबद्धतेनुसार, आम्ही सुरुवातीला प्रत्येक डायलिसिस सत्रासाठी ७०० आकारले. रुग्णांना येणारा आर्थिक भार ओळखून, आम्ही अलीकडच्या काही वर्षांमध्ये प्रति सत्र खर्च ४०० पर्यंत कमी केला आहे. आत्तापर्यंत आम्ही २.०० कोटी रुपयांच्या सेवा त्याच्या सदस्यांकडून निधी उभारणीद्वारे, , अनेक लोकांकडून मदतीचे हात प्रदान केल्या आहेत.

आमचे ध्येय संख्येच्या पलीकडे गेले आहे-या वर्षांमध्ये, आम्ही केवळ किडनीच्या आजाराने ग्रस्त असलेल्यांना केवळ परवडणारी आरोग्यसेवाच नव्हे तर सहानुभूती आणि काळजी देखील देऊन असंख्य जीवनांवर सकारात्मक प्रभाव पाडला आहे. ज्या रुग्णांना उपचार परवडत नाहीत अशा रुग्णांना सतत पाठिंबा देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत आणि देणग्या आणि दानशूर समाजाच्या, समुदायाच्या पाठिंब्याद्वारे आम्ही अनेक रुग्णांना मोफत उपचार प्रदान करण्यात यशस्वी व सक्षम झालो आहोत.

आज आयोजित करण्यात आलेली पत्रकार परिषद गेल्या दशकभरातील आमच्या कार्यावर प्रकाश टाकते आणि आमच्या कारणाला पाठिंबा देण्यासाठी समाजाला आमच्या आवाहनाचे नूतनीकरण करते. प्रत्येक जीवन महत्त्वाचे आहे आणि तुमच्या मदतीने आम्ही आणखी गरजू रुग्णांपर्यंत पोहोचू शकतो. किडनीची गरज असलेल्या प्रत्येक रुग्णाला जीवनरेखा देण्यासाठी आम्ही व्यक्ती आणि व्यवसायांना या मिशनमध्ये आमच्यासोबत हात जोडण्यासाठी आमंत्रित करतो.

यावेळी बोलताना लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर मिडटाऊनचे अध्यक्षांनी सांगितलेः ''हा मैलाचा दगड सामूहिक प्रयत्नांच्या सामर्थ्याचा दाखला आहे. आमचा प्रवास आमच्या समुदायाच्या, देणगीदारांच्या आणि समर्थकांच्या विश्वासाशिवाय आणि औदार्याशिवाय शक्य झाला नसता.

आम्ही आमचा ११ वा वर्धापन दिन साजरा करत असताना, आम्ही या सेवेचा आणखी विस्तार करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आर्थिक मर्यादांमुळे कोणत्याही रुग्णाला त्रास सहन करावा लागणार नाही.''

लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर मिडटाऊनला मिडटाऊन लायन्स मेडिकल सर्व्हिसेस ट्रस्ट, ऍपेक्स हॉस्पिटलसमोर, बस्सय्ये नगर, छ संभाजीनगर येथे आरोग्य ग्रंथालय आणि आरोग्य व्याख्यानमाला सुरू केल्याचा अभिमान वाटतो. या नवीन उपक्रमाचा उद्देश वाचनाची सवय, आरोग्य जागरुकता वाढवणे आणि सर्वसामान्यांना लाभ देण्यासाठी आरोग्याशी संबंधित मौल्यवान संसाधने प्रदान करणे हे आहे. हेल्थ लायब्ररी विविध वैद्यकीय परिस्थिती, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, मानसिक आरोग्य, पोषण आणि जीवनशैली सुधारणे यावरील पुस्तके, जर्नल्स, ब्रोशर आणि डिजिटल सामग्रीचा संग्रह प्रदान करेल. हे समाजातील सर्व सदस्यांसाठी प्रवेशयोग्य असेल, ज्ञान असलेल्या व्यक्तींना निरोगी जीवन जगण्यासाठी सक्षम करेल.

## आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी- निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके

अहिल्यानगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाली असून आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येकाने सोपविलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके यांनी दिले. कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील निवडणूक आचारसंहिता भरारी पथकांच्या बैठकीत त्या बोलत होत्या. याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी महेश सावंत, नायब तहसीलदार प्रफुल्लीता सातपुते व आचारसंहिता कक्षाचे अधिकारी उपस्थित होते. श्रीमती सोळंके म्हणाल्या, एफएसटी (भरारी) पथकाने सी-व्हीजील ॲप मोबाईलवर कार्यरत करून घ्यावे. आचारसंहिता भंगाच्या तक्रारीचे शंभर मिनीटांच्या आत निवारण करावे. एफएसटीच्या ६ पथके कार्यरत झाली आहेत. स्थिर सर्वेक्षण पथकांसाठी ३ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्यासाठी दिवसा ३ व रात्री ३ पथके चेक पोस्टसाठी कार्यान्वीत असतील. व्हिडिओ सर्वेक्षण पथकांनी सर्व राजकीय सभांचे काटेकोरपणे व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे. खर्च पथकानेही सूक्ष्म तपासणी करावी. निवडणूककामी कोणत्याही पथक प्रमुखांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये अथवा रजेवर जावू नये असे निर्देशही श्रीमती सोळंके यांनी दिले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे वाचन करून त्यानुसारच त्याची अंमलबजावणी करावी. कार्यालय व परिसरातील विकास कामांचे भूमिपूजन फलक, कोनशीला, राजकीय व्यक्तींची छायाचित्रे व पक्षाची चिन्हे असलेले बॅनर, होर्डिंज तात्काळ काढण्यात यावे. रस्ते व सार्वजनिक जागेवर प्रचार साहित्य लागणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

## आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी; जिल्हाधिकाऱ्यांकडून मनाई आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यासोबतच जिल्ह्यात निवडणूक आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी सुरु झाली असून त्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी विविध मनाई आदेश जारी केले आहेत.

निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तिगत जागा, इमारत, आवार, भिंत इ. चा वापर संबंधित मालकाच्या परवानगी शिवाय तसेच संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय वापर करण्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) (घख)अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

निवडणूक प्रचारा दरम्यान राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने, त्यांच्या प्रतिनिधींनी, हितचिंतकांनी, मुद्रणालयाच्या मालकांनी, प्रकाशकांनी नमुना मतपत्रिका छापतांना उमेदवाराचे नाव, नेमून देण्यात आलेली चिन्हे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद, आकार वापरणे इ. करण्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १२७ (क) अन्वये निर्बंध घालण्यात आले आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान ध्वनीक्षेपकाचा वापर करण्याबाबत निर्बंध घालण्यात आले आहे. त्यात संबंधित पोलीस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करणे, सकाळी ६ वाजण्यापूर्वी व रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर करण्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे ३३ (एन) अन्वये निर्बंध असून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ति यांनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपक वापर करण्याबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस देणे बंधनकारक आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान लावण्यात येणाऱ्या पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट, कटआऊट, पेंटिंग, होर्डिंग, कमानी, घोषवाक्य लिहिणे इ. रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने लावण्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे ३३(१) (घक) अनवये निर्बंध घालण्यात आले आहेत.

निवडणूक प्रचारादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, विश्रामगृहे यांच्या इमारत, आवार व परिसरात निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही प्रकारे वापर करण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशन दाखल करतांना, पाच पेक्षा जास्त व्यक्ति निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उपस्थित असणे, नामनिर्देशन दाखल करते वेळी कार्यालय परिसरात मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देणे, वाद्य वाजवणे इ. प्रकारे प्रचार करण्यास तसेच कार्यालयाच्या १०० मिटर परिसरात तीन पेक्षा जादा वाहने आणण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत शस्र परवानाधारकांना शस्त्र बाळगण्यास- वापरण्यास, शस्त्र परवाना देण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये हे निर्बंध घालण्यात आले आहेत.

निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जिल्हाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तहसिलदार या सर्व कार्यालयांच्या परिसरात उपोषण , मोर्चा, निदर्शने, घेराव इ. आंदोलने करण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये मनाई करण्यात आली आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वाहनांवर झेंडे, बॅनर, बोधचिन्ह इ. लावणे, घोषवाक्य लिहिण्यास मनाई करण्यात आली आहे.

वरील सर्व निर्बंध, मनाई आदेश हे निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (दि.२५ नोव्हेंबर) पर्यंत अंमलात राहतील,असेही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.

# करमाड पोलीसांनी बेवारस अवस्थेत सापडलेल्या ६५ वर्षीय आजोबास माणुसकी वृद्ध सेवालय येथे केले पुनर्वसनासाठी दाखल




छत्रपती संभाजीनगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सदर व्यक्ती हा करमाड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सेलुद गाव शिवारात लाडसांवगी चौका रोड रामगड येथे सायंकाळी पासुन बेवारस अवस्थेत फिरत असल्याने स्थानिक नागरिकांनी पोलीस पाटील शेलुद भिमराव चौधरी यांना माहिती दिली असता सदर बेवारस व्यक्ती ची चौकशी केली असता त्याने आपले नाव पोपट तुकडु धुदे राहनार वडवे ता.मुक्ताईनगर जि.जळगाव असे सांगीतले असता चौधरी यांनी सदर वृध्द व्यक्तीची माहित करमाड पोलीस ठाण्याचे साय्यक पोलीस निरीक्षक प्रताब नवघरे साहेब,यानां माहित दिली असता साहेबांनी शहानिशा करुन सदर वृध्द मळकटलेले कपडे अगांची दुर्गंधी पसरली होती तो वृध्द गेल्या अनेक दिवसापासून बाहेर फिरत होता घरच्या नातेवाईक यांची माहिती सांगत नसल्याने त्यास नीवाऱ्याची गरज असल्याने स.नो.पी.नवघरे यांनी तात्काळ फोनद्वारे माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित यांना दिली असता सदर वृध्द व्यक्तीस नातेवाईकांचा शोध लागेपर्यंत तातपुरत्या निवाऱ्यासाठि आपले माणुसकी वृद्ध सेवालय धोपटेश्वर फाटा जटवाडा रोड येथे ठेवण्यास सांगितले असता माणुसकी समुहाच्या टिम ने तातपुरत्या निवाऱ्यासाठि दाखल करुन घेतले आहे.सुमित यांनी आज सकाळी आजोबांशी आपुलकी ने मायेता हात देत विचारणा केली तर ते रडले व सांगीतले कि मी १९९८ साली पासुन मुलांच्या त्रासाला कंटाळुन मी घर सोडले आहे मी मीळेल ते काम करतो आनी खातो कुठेहि झोपतो मी सध्या मनमाड येथे बिगारी काम करतो सुमित यांनी सदर वृध्दाच्या गावातील पोलीस पाटील यांच्या शी फोनद्वारे संपर्क साधुन माहिती घेतली त्यांनी हि हिच माहिती दिल्याने त्यांना पोलीसांनी व माणुसकी समुहाने मदत केली या सामाजिक वृध्दाच्या मदतीसाठी स.नो.पी.प्रताब नवघरे करमाड पोलीस स्टेशन,संजय जगताप साहेब,दादाराव पवार साहेब,राजु महेर,शशीभुषन निर्मळ,गोपिचंद बीगोत,पोलीस पाटील चौधरी,माणुसकी वृध्द आश्रमाच्या संचालीका सौ.पुजा सुमित पंडित आदिंनी मदत कार्य केले.व पोलीस सदर व्यक्ती च्या नातेवाईकांचा शोध घेत

### त्यांना दुःख देण्याचा आमचा काय अधिकार ? एक सामाजिक दायित्व म्हणून मदत केली

ज्या आई-वडिलांनी आम्हाला लहानाचे मोठे केले स्वतःचे दुःख सहन करून आम्हाला सुखाची सावली दिली.असे असताना जेंव्हा आई-वडिलांना एकटे सोडून देणे ही माणुसकी नाही. रात्री बेरात्री कुठलाही गैरप्रकार घडु नये हे गांभीर्याने लक्षात घेता तात्काळ आजोबास पुनर्वसनासाठी माणुसकी वृध्दाश्रमात दाखल केले.

ही बाब समाजातील कुठल्याही आई-वडिलांना त्रास न देता त्यांची सेवा केली पाहिजे.ज्यांच्या मुळे आम्ही जग पाहिले त्यांना दुःख देण्याचा आपणास कोणताही अधिकार नसतो.सुमित सारखे व्यक्ती समाजात आहे की ते खरोखरच दैवी कार्य बेवारसांचा सांभाळ करतात.सदर आजोबाच्या नातेवाईकांचा शोध आम्ही घेत आहोत

**- प्रताब नवघरे**
सहाय्यक पोलीस निरीक्षक करमाड पोलीस स्टेशन

## टिव्ही सेंटर मैदानावर फटाक्यांच्या दुकानांना मनसेचा विरोध

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- औरंगपुरा येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर असलेल्या फटाक्यांच्या दुकानांना ऑक्टोबर २०१६ मध्ये भीषण आग लागली होती. शहराची मुख्य बाजारपेठ आणि वर्दळीच्या ठिकाणीच हि घटना घडल्याने पुन्हा मनपा प्रशासनाने टीव्ही सेंटर येथील मैदानावर फटाक्यांच्या दुकानांना परवानगी देण्याचा उद्योग सुरु केला आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात वर्दळ असूनही महापालिका प्रसाशन आणि काही अधिकारी आपली खाबुगिरी करण्यासाठी फटाक्यांच्या दुकाने थाटात नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत आहे. त्यामुळे या ठिकाणी पुन्हा जर अशी दुर्घटना झाल्यास हमी कोणते अधिकारी घेणार असा सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव अनिकेत निल्लावार यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात उपस्थित केला आहे. टीव्ही सेंटर येथील मोकळ्या मैदानावर रोज तळीरामांची मैफल रंगत असते. याकडे जिल्हा प्रशासनाचे सर्रासपणे दुर्लक्ष दिसून येते. याच मैदानाचे विकास करण्याएवजी महापालिकेने विकास आराखड्याचा भंग करत ही मैदाने भाडेतत्वावर देण्याचा सपाटा लावला आहे. टीव्ही सेंटर मैदानावर आनंद नागरी, तसेच इतर कार्यक्रम घेण्यासाठी भाडेतत्वावर देण्यावर भर दिला आहे. यातून लाखो रुपयांचे उत्पन्न महापालिका प्रशासन करत असून अनेक अधिकाऱ्यांची खाबुगिरी सुरु असल्याची चर्चा आहे. परिणामी खेळासाठी तसेच खेळाडू घडविण्याएवजी हि मैदाने आता फटाक्यांच्या दुकानांसाठी भाडेतत्वावर देत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत वर्दळीच्या ठिकाणीच फटाक्यांची दुकाने थाटली तर कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. टीव्ही सेंटर मैदानालगत मनपाचे उद्यान असून लहान मुले तसेच पालकांची याठिकाणी वर्दळ असते. त्यामुळे या मैदाना लगत कोणतेही फटाक्यांची दुकाने नसावी अशी मागणी मनसे ने केली असून दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्यास मनसे स्टाईल ने मनपा प्रशासनाला जाब विचारला जाईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव अनिकेत निल्लावार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदन प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे चंदू नवपुते, गणेश साळुंखे, विक्की जाधव, अविनाश फोफळे, शिवा ठाकरे, अजय कागडा, रवी गायकवाड, अमित जैस्वाल यांची उपस्थितीती होती.

## 'गोदावरी बायोरिफायनरीज लि.'ची प्राथमिक समभाग विक्री २३ ऑक्टोबरपासून

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- गोदावरी बायोरिफायनरीज लिमिटेड (जीबीएल किंवा कंपनी) या कंपनीची प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) येत्या बुधवारी, दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी खुली होणार आहे. आयपीओच्या या ऑफरमध्ये ३२५ कोटी रुपये किमतीच्या नवीन इक्विटी शेअर्सच्या विक्रीचा (फ्रेश इश्यू), तसेच ६५ लाख २६ हजार ९८३ इतक्या इक्विटी शेअर्सच्या फेरविक्रीचा (ऑफर फॉर सेल) समावेश आहे. (फ्रेश इश्शू व ऑफर फॉर सेल या दोन्हींचा मिळून उल्लेख टोटल ऑफर साईझ). ऑफरचा किंमतपट्टा (प्राइस बँड) ३३४ ते ३५२ रुपये प्रति इक्विटी शेअर असा निश्चित करण्यात आला आहे. गुंतवणूकदारांना या ऑफरमध्ये किमान ४२ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४२ इक्विटी शेअर्सच्या पटीत (बिड साइज) बोली लावता येईल. या 'आयपीओ'मधून उभारला जाणारा निधी काही कर्जांची संपूर्ण वा अंशतः परतफेड करण्यासाठी वापरण्याचा कंपनीचा मानस आहे. या कामी निधीतील २४० कोटी रुपये वापरले जातील. उर्वरीत रक्कम सर्वसाधारण कॉर्पोरेट खर्चासाठी राखून ठेवली जाईल.'आयपीओ'च्या 'ऑफर फॉर सेल'मध्ये सोमय्या एजन्सीज प्रायव्हेट लिमिटेडकडील ५ लाख इक्विटी शेअर्स, समीर शांतीलाल सोमय्या यांच्याकडील ५ लाख इक्विटी शेअर्स, लक्ष्मीवाडी माइन्स अँड मिनरल्स प्रायव्हेट लिमिटेडकडील २ लाख इक्विटी शेअर्स; फिल्मीडिया कम्युनिकेशन सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेडकडील ३ लाख इक्विटी शेअर्स, सोमिया प्रॉपर्टीज इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेडकडील १ लाख इक्विटी शेअर्स आणि मंडाला कॅपिटल एजी लिमिटेडकडील ४९ लाख २६ हजार ९८३ इक्विटी शेअर्स यांचा समावेश असणार आहे.

# माहिती अधिकार सप्ताहानिमित्त गो. से. महाविद्यालयात विविध स्पर्धा

### सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रतीक तायडे प्रथम, क्रिपा धांडे द्वितीय, यशकुमार फुलकर तृतीय



खामगाव दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ गो. से. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागाद्वारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय तळवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती अधिकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचा समारोप १४ ऑक्टोबर रोजी करण्यात आला. अध्यक्षस्थानी म्हणून संस्कृत विषयाच्या प्रा. संगीता वायचाळ तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून वनस्पतीशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. अशोक पडघान हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. बी. एम. टकले यांनी केले त्यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते माहिती अधिकार सप्ताहामध्ये आयोजित केलेल्या विविध स्पर्धेचे बक्षिसे वितरित करण्यात आले. सामान्य ज्ञान स्पर्धा प्रतीक राजेश तायडे प्रथम, क्रिपा दिलीप धांडे द्वितीय, यशकुमार फुलकर तृतीय, निबंध स्पर्धेसाठी राजकीय व्यवस्था व माहिती अधिकार या विषयावर ४३ विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामधून अनुक्रमे भक्ती संतोष तायडे प्रथम, श्रेया अशोक तेल्हारकर द्वितीय, शेजल गोपाल वानखेडे तृतीय यांना पारितोषिके मिळाली. पोस्टर व भित्तिपत्रक स्पर्धेत वेदश्री कुलकर्णी, मयुरी चीम (सामूहिक) प्रथम, साक्षी अहेरकर द्वितीय, दिशा पायघन तृतीय बक्षीस मिळाली. वक्तृत्व स्पर्धात भ्रष्टाचार नियंत्रणामध्ये माझी भूमिका या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रगट केले. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. अढाऊ व मराठी विभागाचे प्रा. विक्रम मोरे यांनी परीक्षण केले. प्रेरणा सुनील देशमुख प्रथम, गायत्री एकडे द्वितीय, यशकुमार फुलकर तृतीय यांना बक्षिसे मिळाली.

समारोपीय कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा.डी. एस. भुतेकर, प्रा. उमेश खंदारे उपस्थित होते. सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागातील प्रा. वृषाली घोराळे तर आभार प्रदर्शन प्रा. धम्मपाल गवई यांनी मानले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी दिली आहे.

सुटाळा येथील नागरिकांमध्ये विद्यार्थ्यांनी केली जागृती या सप्ताहामध्ये स्पर्धेबरोबर माहिती अधिकार जनजागृती मतदान जनजागृती सुटाळा (बु )या गावी जाऊन महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. बी . एम. टकले व विद्यार्थ्यांनी केली ज्यामध्ये दिशा पायघन, रोहित भोजने, अचल रघुवंशी, सुमित गावंडे, प्रथमेश देविकार, मंजू चंदनसे, विशाल बोचरे या विद्यार्थ्यांचा समावेश होता माहिती अधिकार संदर्भातील माहिती व आपल्या भारत देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान जनजागृती या सप्ताहामध्ये विद्यार्थ्यांकडून करण्यात आली.

# अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीत काँग्रेससह अन्य सहाशेहून अधिक जणांचा शिवसेनेत प्रवेश

जालना दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली आज काँग्रेससह अन्य सहाशेहून अधिक जणांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश कर्त्यांना उद्देशून श्री. खोतकर यांनी त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी बोलतांना शिवसेना नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, आज एवढ्या संख्येने हा प्रवेश सोहळा पार पडत आहे, त्याचे आपण कौतूक करतो. शिवसेनेत ज्यांनी- ज्यांनी प्रवेश घेतला, त्यांचे म्हणणे आपण निश्चितच खाली जाऊ देणार नाहीत. याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी. मग तो वीजेचा प्रश्न, नाल्यांचा प्रश्न असो की, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो. हे सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे श्री. खोतकर यांनी सांगितले.

प्रवेश करणार्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन चे सिद्धार्थ आंबोरे, शुभम अंभोरे, महादू पोळ अमोल गंगा तिवरे असं फाउंडेशनचे शेकडो कार्यकर्ते व अजय कुरिलिये यांच्यासह त्यांचे मित्र मंडळाचे निलेश काकडे, लखन नागरे, सागर तुरे, रिषभ मंडलेकर, कुलदिप बोरे, अमोल पायगव्हाणे, नागेश शिंदे, धरमेश प्रसाद, निखील काकडे, अनिकेत पायगव्हाणे, करण लिधोरिये, सागर मंडोले, गणेश गोरे, दिपक अंबिलढगे,प्रतिक निकम, सुरज सातपुरिये, किशन डोकठे, पियुष मंडोले, श्री. वाघमारे, कृष्णा जेठे, राहुल कुरलिये, सुमित सतपुरिये, प्रविण कुरलिये, योगेश परुरकर, करण परुळकर, लंकेश पाटील, तसेच शाम अवसरमोलल राजीक शेख, अमन अवसरमोल, गोपाल खरात, दिनेश दाभाडे, जमोल भाई, सलीम भाई, अभिषेक उबाळे, शफिक शेख, इंद्रजीत खंदारे, राजूभाऊ भंडारे, विनोद जगधने, पोहकर, प्रकाश जगधने, भरत खंदारे, धोंडीराम ढोरपे, आकाश जगधने, गयाबाई अवसरमोल, जिजाबाई लोंढे, संगिताबाई जगधने, अल्काबाई लहाने, दादाराव लहाने, रंजनाबाई खंदारे, विनोद लहाने, विशाल लहाने, लिलाबाई जोगदंड, रवि पोहेकर, शहबाद बी, साबेत बी, कृष्णा ढोरपे, शांताबाई भंडारे, लक्ष्मण खंदारे, नवीन मोंढ्याया पाठीमागे आनंदनगर व संताजी नगर या मध्ये अद्यापही लाईटची सुविधा नाही, आदी अनेक समस्या असून त्याचा विचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच यावेळी शाकीर खान व असलम मदनी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत



पक्ष प्रवेश केला. या सर्वांचा पुष्पहार देऊन श्री. खोतकर यांनी सत्कार केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या पदाधिकार्यांनीही यावेळी शिवसेनेत प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी सत्कार केला. याप्रसंगी शहर प्रमुख विष्णू पाचफुले, जफर खान, अशपाक पठाण, शेख नजीर भाई, ताहेर खान, बडे खान, मुसा परसुवाले, परवेज खान, खालील के पी, एजाज भाई,सय्यद इकराम, अज्जू भाई, तसेच शेकडो शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अंजली ताई आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सेवली येथील प्रबुद्ध जनजागृती मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा- दिपक डोके

जालना दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- तालुक्यातील सेवली येथे वंचितांच्या माय माऊली अंजली ताई आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली प्रबुद्ध भारत जनजागृती मेळावा दिनांक २७ ऑक्टोंबर २०२४, रविवार रोजी दुपारी १२:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे या मेळाव्याच्या पुर्वतयारी संदर्भात मंठा तालुक्यातील वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ ऑक्टोंबर २०२४ रोजी मंठा तालुक्यातील उंबरखेडा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.सदरील बैठक वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाली यावेळी बैठकीस संबंधित करतांना श्री .डोके यांनी अंजली ताई आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सेवली येथे होणाऱ्या प्रबुद्ध भारत जनजागृती मेळाव्यास मंठा तालुक्यातील व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते आंबेडकरवादी जनतेने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर खरात,जिल्हा महासचिव डॉ. किशोर त्रिभुवन, जिल्हा सदस्य भारत उघडे , भारतीय बौद्ध महासभा जिल्हा पर्यटन सल्लागार दत्ता चोरमारे, तालुका उपाध्यक्ष अंबादास खरात,तालुका महासचिव संजय वाघमारे, दिलीप मगर, गौतम मगर,राजु जाधव चंद्रकांत मगर रतन उघडे अनिल सदावर्ते राहुल सदावर सुधाकर खरात अनंत खंदारे उत्तम खरात महादेव पाखरे यांच्या सह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मौजपुरी येथील रामेश्वर मंदिरामध्ये गाथा पारायणास भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांची भेट

जालना दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- तालुक्यातील मौजपुरी येथील रामेश्वरी मंदिरामध्ये १०१ वे फिरते पारायण सोहळ्यानिमित्त ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बारड यांच्या गाथा पारायण व कीर्तनास भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांनी भेट दिली, याप्रसंगी रामेश्वरी मंदिर कमिटीच्या वतीने आबांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला.

जालन्यामधून २८ गावांनी यात सहभाग घेतला असून २५० हून अधिक लोक परायणास बसले आहेत. उपस्थित सर्व भाविक भक्तांना भाजपा जालना




विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांच्यावतीने सफरचंद व केळीच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले.

अतिशय भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या गाथा पारायण सोहळ्याप्रसंगी भागवत बावणे, कपिल दहेकर, वसंत शिंदे, बद्रीनाथ भसांडे, निवृत्ती गायकवाड, निवृत्ती लंके, राम जाधव, विष्णू डोंगरे, मुकेश चव्हाण, कैलास उबाळे, गोवर्धन कोल्हे, रामजी शेजुळ, गोपाल चौधरी, रामदास गायकवाड, दत्ता जाधव, सत्यनारायण ढोकळे, हरिभाऊ गोरे आदींसह मोठ्या संख्येने भाविक-भक्तांची व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## रांजणीतील भाजप कार्यकर्त्यांच्या हातात तुतारी

जालना दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील भारतीय जनता पार्टीच्या वैद्यकीय सेलचे तालुका अध्यक्ष तथा सर्कल प्रमुख. डॉ. अनिकेत वरखडे. यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आ.राजेश टोपे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. रविवारी (ता.२०) जालना येथील आ. टोपे यांच्या निवासस्थानी झालेल्या प्रवेश सोहळ्यास आबासाहेब वरखडे. नानाभाऊ उगले. बळवंतराव देशमुख. जगदीश देशपांडे. पप्पू वरखडे. संतोष कुहिरे. प्रीतम वरखडे. गोपीनाथ पाटोळे .दिलीप देवकर. प्रभाकर शिंदे आदींची उपस्थिती होती. या वेळी डॉ. अनिकेत वरखडे, राहुल काळे, रमेश देशमुख ,लक्ष्मण शिंगणे. यांनी पक्षात प्रवेश केला. त्यांचे आ. राजेश टोपे यांनी स्वागत केले.

## बॉल आउट मध्ये चंद्रपूर विजेता, नागपूर उपविजेता!

### दिव्य ज्योती अंध युवा राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात समारोप

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- दिव्य ज्योती फाउंडेशन, राष्ट्रीय दृष्टिहीन संघ आणि धुत ट्रान्समिशन प्रायोजित राज्यस्तरीय अंध युवा क्रिकेट चषक स्पर्धेचा रविवारी ( ता. २०) उत्साहात समारोप झाला. निसर्गाच्या लहरीपणामुळे नागपूर आणि चंद्रपूर संघात घेण्यात आलेल्या बॉल आऊट या दोन षटकांच्या सामन्यात चंद्रपूरच्या संघाने नागपूरच्या संघावर मात करून विजेतेपद पटकावले.

विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत शनिवारी चार सामने खेळविण्यात आले यात गुणाानुक्रमे चंद्रपूर आणि नागपूर हे संघ अव्वल ठरले. काल रात्री झालेल्या पावसामुळे पीच वगळता मैदान सुस्थितीत नसल्याने दहा षटकां ऐवजी एक षटकांचा बॉल आउट सामन्याचा निर्णय आयोजकांनी घेतला. पहिल्या षटकात दोन्ही संघ बरोबरीत राहिले त्यानंतर दोन्ही संघांच्या कर्णधारांनी एक प्रत्येकी एक षटक टाकले.

सुरुवातीस नागपूरच्या संघास बॉल आउट करता आले नाही तदनंतर चंद्रपूरचा कर्णधार गोकुळ पारधी याने तिसऱ्या चेंडूवर अचूक नेम धरत आऊट करून आपल्या संघास विजेते पद मिळवून दिले.

धुत ट्रान्समिशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब तोडकरी, सिमेन्सचे मुख्य अधिकारी समित सचदेवा, समाजसेविका शर्मिला गांधी यांच्या हस्ते विजेत्या चंद्रपूर संघास ११००१,उपविजेता नागपूर संघास ७००१ रुपये रोख, ट्रॉफी,तसेच सहभागी संघांतील खेळाडूंना मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सुत्रसंचालन डॉ. निकेश मदारे यांनी केले तर दिव्य ज्योती चे अध्यक्ष गणेश मुंढे यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ.संदीप जगताप ,नारायण भुजंग, दिव्य ज्योतीचे सचिव ॲड. जोगेंद्रसिंह चौहान ,सचिव माणकेश्वर बडे, दृष्टिहीन संघाचे उपाध्यक्ष गोविंद डोंगरे ,सामना पर्यवेक्षक गजानन काकडे, श्रीकांत पाटील, समीर धवलशंख, दिनेश महाजन ,विठ्ठल जाधव, ॲड.कैलास



कोळपकर, भूषण राऊत, गजानन सोनवणे, सतीश भुतेकर, कृष्णा खांदवे, स्वयंसेवक, क्रिकेट रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अनिकेत पगारे,अभिषेक ढोभाळे,विजय कुदळे यांच्या सह विद्यापीठातील एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# कायद्याची दिशाभूल व चुकीची माहिती शेअर केल्यास तात्काळ गुन्हे दाखल -पोलिस उपायुक्त लोहित मतानी

## निवडणूक अनुषंगाने पोलिस विभागाची सोशल मीडियावर पाळत

नागपूर दि.२१ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा मतदानाच्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था अबाधीत राहावी यादृष्टीने आता पोलीस विभागाचा सायबर सेल हा सोशल मीडियावर लक्ष ठेवून आहे. आपल्या सोशल मीडियाच्या अकाऊंटवरुन अथवा इतर माध्यमातून कोणी चुकीचा संदेश फॉरवर्ड केला अथवा दुसऱ्या सोशल माध्यमांवर शेअर केला तर संबंधित व्यक्ती विरुद्ध तात्काळ कारवाई केली जाईल, असे प्रतिपादन पोलीस उपायुक्त लोहित मतानी यांनी केले. ग्रामीणभागातील प्रत्येक पोलीस ठाण्यापासून शहरातील पोलीस ठाण्यापर्यंत यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांचा एक कृतीगट ही कारवाई करेल, असे ते म्हणाले.

जिल्ह्यातील पोलीस विभागांतर्गत असलेल्या सायबर सेल व गुप्त वार्ता विभागातील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांचा प्रशिक्षण सत्रातते बोलत होते. पोलीस आयुक्त कार्यालय येथील सभागृहात आयोजित या सत्रास जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक अमोल देशमुख व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

भारतीय राज्य घटनेने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र जरी दिले असले तरी कायद्याचा कोणताही भंग होणार नाही याची जबाबदारी राज्यघटनेने प्रत्येकावर टाकलेली आहे. खोट्या पोस्ट तयार करणे, समाजाची दिशाभूल करणे, मजकुरात खाडाखोड करुन समाजात तेढ निर्माण होईल अथवा सामाजिक शांततेला बाधा पोहोचेल अशा प्रकारची कोणतीही कृती पोस्ट / मजकूर / चित्र आदी शेअर जरी केले तरी तो कायद्यानुसार गुन्हा आहे. चुकीची पोस्ट जरी तयार केली नसली आणि फक्त शेअर केली हा सुद्धा गुन्हा आहे. अशा प्रकारचा गुन्हा सोशल माध्यमांवर अथवा इतर माध्यमातून निर्देशनास आला तर कोणताही वेळ न दडवता तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश पोलीस उपायुक्त मतानी यांनी दिले. विविक्षित प्रसंगी जर वेळ आलीच तर कोणी तक्रार करेलयाची वाट न पाहता सुमुटो स्वत:हून कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५१ हा आदर्श आचारसंहितेचा मुख्य गाभा आहे. निवडणूक आचार संहितेच्या अनुषंगाने अनेक बाबी या अधिनियमात स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक जिल्हापातळीवर माध्यमांच्या अनुषंगाने माध्यम प्रमाणिकरण व संनियत्रण समिती तयार करण्यात आलेली आहे.

विधानसभेच्या कोणत्याही उमेदवाराला आपल्या प्रचारासाठी जे साहित्य वापरावयाचे आहे त्याचे प्रमाणिकरण या समितीमार्फत केले जाते. कोणतेही साहित्य हे प्रचारासाठी वापरावयाचे असेल तर त्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. पोलीस विभागांतर्गतअसलेली सायबर शाखा, जिल्हा माहिती कार्यालय, सर्व पोलीस स्थानक प्रमुखयांच्यावतीने



मुख्यालयस्थळी सायबर विभागातील कर्मचाऱ्यांची टीम यात मिळून जबाबदारी पार पाडतील असा विश्वास जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी व्यक्त केला. यावेळी पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

# चेहऱ्यावर येतो सर्वाधिक घाम, फायदेशीर ठरतील घरगुती अतिशय सोपे उपाय

होळीनंतर उन्हाळ्याला सुरुवात होतो. हाच उन्हाळा आता जाणवू लागला आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्यात उन्हाचा कडाका वाढला आहे. हवमान विभागाच्या माहितीनुसार, मुंबईचं तापमान ३५ अंशावर गेलं आहे. पुढील ४ ते ५ दिवसात तापमानात आणखी २ ते ३ अंशाची वाढ होईल असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. उष्ण आणि दमट परिस्थितीमध्ये नागरिकांना उन्हाचा फटका जाणवत आहे. अशावेळी भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. मात्र असे असले तरीही चेहऱ्याला प्रचंड घाम येण्याची समस्या अनेकांना जाणवते.

उन्हाळा अनेक समस्या घेऊन येतो. पण तुम्हाला सर्वात जास्त त्रास देणाऱ्या तीन गोष्टी म्हणजे घाम, घामोळे-पुरळ आणि शरीराची दुर्गंधी. जरी काही लोक वर्षभर घामाच्या समस्येने त्रस्त असतात, परंतु बहुतेक लोकांना उष्ण आणि दमट हवामानात जास्त घाम येण्याची समस्या भेडसावत असते. जास्त घाम येणे हानीकारक नाही परंतु ते एखाद्या व्यक्तीला या घामामुळे लाजिरवाण्या प्रसंगाला सामोरे जावे लागेल. त्यामुळे यावर वेळीच उपचार करणे अत्यंत आवश्यक आहे. उन्हाळ्यात चेहऱ्यावर जास्त घाम का येतो आणि ते कोणत्या उपायांनी थांबवता येईल.



**उन्हाळ्यात चेहऱ्याला जास्त घाम का येतो ?**

जरी उन्हाळ्यात घाम येणे ही अगदी सामान्य गोष्ट आहे, परंतु जर एखाद्याला फक्त चेहऱ्यावर जास्त घाम येत असेल तर ती गंभीर समस्या असू शकतो. जास्त घाम येण्याच्या स्थितीला वैद्यकीय शास्त्राच्या भाषेत हायपरहायड्रोसिस म्हणतात. याशिवाय घाम येण्याची इतरही अनेक कारणे असू शकतात. जर आपण आकडेवारी पाहिली तर, १०० पैकी फक्त २ किंवा ३ लोक या प्रकारच्या समस्येने ग्रस्त आहेत. घामाच्या ग्रंथींचा अति घाम येणे, हवामानातील बदल, ताणतणाव, काही औषधांचे अतिसेवन, मद्यपान, ड्रग्ज आणि धूम्रपान, याशिवाय रजोनिवृत्ती, लठ्ठपणा, मधुमेहाचा संसर्ग आणि कमी रक्तदाब यामुळेही चेहऱ्यावर जास्त घाम येतो.

**प्रभावी घरगुती उपाय**

जर तुम्ही उन्हाळ्यात बाहेर जात असाल तर त्याआधी तुम्हाला ज्या भागात घाम येतो त्या भागावर बर्फ चोळा. यामुळे घाम येणे कमी होते.

उन्हाळ्यात जर तुमच्या चेहऱ्याला जास्त घाम येत असेल तर बटाट्याचे तुकडे करून ते चोळल्याने घामापासून आराम मिळतो.

चेहऱ्यावर जास्त घाम येत असल्यास काकडीचा रस लावा आणि काही वेळ तसाच राहू द्या. यानंतर, जेव्हा तुम्ही बाहेर जाल तेव्हा तुम्हाला वाटेल की घाम कमी झाला आहे.

उन्हाळ्यात चेहऱ्यावर जास्त घाम येत असेल तर आहारातील मीठाचे प्रमाण कमी करा.

उन्हाळ्यात जास्त घाम येण्याच्या भीतीने अनेकजण पाणी कमी पितात त्यामुळे घामाला दुर्गंधी येऊ लागते. असे केल्याने घाम येणे कमी होत नाही पण शरीराची दुर्गंधी नक्कीच येते. त्यामुळे घाम आणि दुर्गंधीपासून मुक्त होण्यासाठी शक्य तितके पाणी प्यावे.

उन्हाळ्यात तुमच्या चेहऱ्याला जास्त घाम येत असेल तर दिवसातून एकदा टोमॅटोचा रस प्या. यामुळे घामापासून बऱ्याच अंशी आराम मिळू शकतो.



## बदलत्या हवामानात स्वत:ला हायड्रेट ठेवणे गरजेचे, डिहायड्रेशन टाळण्यासाठी लावा या सवयी

बदलत्या हवामानात आपण अनेकदा पाणी कमी पितो आणि यामुळे डिहायड्रेशनचा त्रास होतो. यामुळे आपल्या आरोग्यास नुकसान पोहोचते. डिहायड्रेशनपासून वाचायचे असेल तर काही सवयी आजच लावून घ्यायला हव्या.

पुरुषांनी कमीत कमी ३.७ लिटर लिक्विड घेणे गरजेचे असते तर महिलांनी २.६ लीटर, जर तुमचे पाणी पिण्याचे प्रमाण योग्य आहे तर तुमचे शरीर चांगले कार्य करते. तसेच यामुळे तुम्ही शारिरीक आणि मानसिकरित्या ॲक्टिव्ह राहता.

अनेकांना बऱ्याचदा डिहायड्रेशनची समस्या सतावते. यामुळे त्यांना चक्कर येणे, थकवा जाणवणे, उल्टी येणे, डोळ्यासमोर अंधारी येणे या समस्या सतावतात. अशातच तुम्हाला स्वत:ला हायड्रेट ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी काही सवयी आजच लावून घ्या.

तहान लागल्यास लगेचच पाणी प्या. जर तुम्ही तहानेकडे दुर्लक्ष केलं तर ते महागात पडू शकतं.

सकाळी उठल्यावर एक ग्लास पाणी पिण्याची सवय लावा.

जर तुमचे तोंड सतत सुकत असेल तर तुमच्या शरीरात पाण्याची कमतरता आहे. यावेळेस भरपूर पाणी प्या. तोंड सुकत आहे असे वाटल्यास लगेचच पाणी प्या.

दिवसभरात ८ ते १० ग्लास पाण्याचे सेवन करणे गरजेचे असते. मात्र बदलत्या हवामानात जितके पाणी प्याल तितका फायदा होईल.

जेव्हा तुम्ही वर्कआऊट कराल तेव्हा पाणी पिणेही वाढवा. व्यायामादरम्यान शरीरातून पाणी बाहेर टाकले जाते. यामुळे पाणी मोठ्या प्रमाणात प्या.

## कोल्ड्रिंक सोडा, उन्हाळ्यात प्या भरपूर ताक, पचनासहित या समस्यांमध्ये फायदेशीर

बदलत्या वातावरणासोबत तापमानातही वाढ होत आहे. यामुळे लोकांच्या डाएटमध्येही बदल होतो. लोक आपल्या आरोग्य चांगले राह्यासाठी विविध प्रकारच्या पेय पदार्थांचा डाएटमध्ये समावेश करतात. सोबतच फळांचेही सेवन करतात. यामुळे तापमानाचा परिणाम त्यांच्या शरीरावर पडता कामा नये आणि आरोग्य चांगले राहावे.

उन्हाळ्यात उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी कोल्ड्रिंक पितात. मात्र ते पिण्याऐवजी तुम्ही ताक पिऊ शकता. यामुळे तुमच्या आरोग्यासही त्रास होणार नाही. यामुळे शरीराला डिहायड्रेशनचा त्रास होत नाही.

ताकामध्ये अनेक पोषकतत्वे असतात जसे कॅल्शियम, प्रोटीन,व्हिटामिन, ए, बी,सी, ई के सह अँटीऑक्सिडंटही असतात. उन्हाळ्याच्या दिवसांत शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही ताकाचे सेवन करू शकता. जर तुम्हाला ॲसिडिटी, पोटात जळजळ असा त्रास आहे तर तुम्ही ताकाचे सेवन करा.

ताक पिताना नेहमी त्यात काळे मीठ अथवा सैंधवचा वापर करावा. यामुळे ताक पचण्यास सहज होते.



## हे पदार्थ खात असाल तर वाढतो कॅन्सरचा धोका, वेळीच सावध व्हा!

आपण रोजच्या जीवनात काय खातो त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होत असतो. असाच एक आजार म्हणजे कॅन्सर. आज संपूर्ण जगात कॅन्सर हे मृत्यूचे सर्वा मोठे कारण आहे. कॅन्सरच्या रुग्णांच्या संख्येत आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये आपली जीवनशैलीच कारणीभूत ठरते असं एका अभ्यासातून निर्दशनातून दिसून आले. बदलत्या जीवनशैलीमुळे जिथे आपल्यापैकी बहुतेक फास्ट फूडचे, प्रोसेस्ड, स्मोक्ड आणि रेड मीट यांसारख्या पदार्थांचे सेवन करतात. परिणामी कॅन्सरसारख्या आजारांचा धोका ओढावू शकतो. कॅन्सरच्या रुग्णांच्या वाढत्या संख्येमागे आपला आहार हे प्रमुख कारण असल्याचे सांगितेल जाते. या पदार्थांमुळे कॅन्सरच्या पेशींशी लढण्याची शक्ती संपते. त्यामुळे असे कोणते पदार्थ आहेत, ज्यामुळे कॅन्सरचा धोका वाढू शकतो ते जाणून घ्या.

**तळलेले अन्न –** जेव्हा आपण खूप गरम तेलाच अन्न तळतो तेव्हा हेटरोसायक्लिक अमाइन आणि ग्लायकेशन एंड उत्पादने तयार होतात. तळलेले बहुतेक अन्नपदार्थ हानिकारक असल्याचे दिसून आले आहेत. यामध्ये लाल मांस, अंडी ,लोणी, अंड्यातील बलक, तील आणि शेंगदाणे यांचा समावेश आहे.

**जेनेटिकली मोडिफाइड फूड –** जैवतंत्रज्ञान आणि अनुवांशिक अभियांत्रिकीतील प्रगतीमुळे, अन्नपदार्थांमध्ये अनेकदा नवीन बदल दिसून येतात. जसे की, काही काळापूर्वी तांदूळ तयार करण्यात आला होता ज्यामध्ये व्हिटॅमिन ई असायचे. मात्र आता त्याच तांदळामध्ये पुरेशी व्हिटॅमिन ई नसतात. परिणामी निसर्गात सापडलेल्या अन्नपदार्थांमध्ये बदल करुन त्यांचे स्वत:चे आरोग्यदायी परिणामी देऊ शकतात. म्हणूनच आपल्या आहारामध्य अधिकाधिक सेंद्रिय पदार्थांचा समावेश करण्याचा प्रयत्न करा.



**प्रोसेस्ड मटण –** भारतात असे अनेक मांसाचे पदार्थ उपलब्ध आहेत ज्यावर प्राण्यांवर प्रक्रिया करुन कॅन केले आहे. यामध्ये बेकन सॉसेज हॉट डॉग इ. हे पदार्थ ताजे ठेवण्यासाठी अनेक रासायनिक संरक्षकांनी सुसज्ज आहेत. हे पदार्थ दिसायला ताजे दिसतात पण त्यांचे सेवन कर्करोगास कारणीभूत ठरु शकते. सोडियम नायट्रेट आणि सोडियम नायट्रेट वाफेचा वापर मांस टिकवण्यासाठी केला जातो. ही दोन्ही रसायने कोलन आणि रेक्टल कॅन्सरसाठी थेट जबाबदार असल्याचे आढळून आले आहे. म्हणून, जर तुम्ही मांस खात असाल तर नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेले मांस खाण्याचा प्रयत्न करा. कॅन केलेला मांस आणि प्रक्रिया केलेले मांस यांपासून शक्य तितके दूर रहा.

**सोडा आणि कोल्डड्रिंक –** प्रोसेस्ड मांसाप्रमाणे सोडा आणि कोल्डड्रिंक देखी कॅन्सरला कारणीभूत ठरु शकते. यामध्ये भरपूर चायनीज फूड केमिकल्स आणि कलरिंग एजंट आढळतात. हे सेवन केल्याने शरीरातील आम्लता वाढते. जे कर्करोगासाठी कारणीभूत ठरु शकते.

**मैदा –** गव्हापासून मिळणाऱ्या सर्व उत्पादनांमध्ये पांढरे पीठ हे आरोग्यासाठी सर्वात धोकादायक आहेत. मैद्यात कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण खूप जास्त असते जे आरोग्यासाठी मोठा धोका आहे.

## आवळ्याचा चहा पिण्याचे हे जबरदस्त फायदे अनेकांना माहित नाहीत

*चुकीच्या जीवनशैलीमुळे आपल्याया वेगवेगळ्या आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे काही घरगुती उपाय करून तुम्ही निरोगी राहण्याचा प्रयत्न करू शकता. आवळा हे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे मानले जाते. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असल्याने केस, डोळे आणि त्वचेसाठी ते अधिक फायदेशीर मानले जाते. आवळा रोज खात असाल तर तुमची रोगप्रतिकारशक्ती आणखी मजबूत होते. आवळा खाल्ल्याने लठ्ठपणाही देखील दूर होते. पण जर तुम्ही रोज सकाळी आवळ्याचा चहा पित असाल तर याचे देखील अनेक फायदे तुम्हाला मिळू शकतात. आवळा चहा प्यायल्याने पोटात साचलेली घाणही बाहेर पडते.*

*आवळा हे फळ आपले शरीर डिटॉक्स करण्याचे काम करते. आवळ्याचा चहा कसा बनवायचा आणि त्याचे काय फायदे होतात ते जाणून घेणार आहोत.*

*आवळा चहा कसा बनवायचा – आवळा चहा बनवण्यासाठी प्रथम तुम्ही २ कप पाणी उकळत ठेवावे. त्यामध्ये थोडे आले किसून टाकावे. ४-५ तुळशीची पाने घालावी. आता १ चमचा आवळा पावडर पाण्यात घालून उकळू द्या. जेमतेम अर्धे पाणी उरले की गॅस बंद करा आणि गाळून प्या. आता चहासारखे कोमट करून तुम्ही ते पिऊ शकता.*

*तुम्ही चहा व्यतिरिक्त इतर कोणत्याही पेय किंवा स्मूदीमध्ये अशा प्रकारे आवळा पावडर वापरू शकता. सर्व प्रथम, रिकाम्या पोटी आवळा चहा प्यायल्याने वजन लवकर कमी होण्यास मदत होते. त्यामुळे शरीरात साचलेली घाणही सहज निघून जाते.*



*आवळा चहा पिण्याचे फायदे – आवळ्याचा चहा जर तुम्ही दररोज पित असाल तर तुमची पचनक्रिया मजबूत होत जाते. यामुळे बद्धकोष्ठता आणि अपचन सारख्या पचनाच्या समस्या दूर होतात. आवळा चहा प्यायल्याने रक्तातील साखरेची पातळीही नियंत्रणात राहते. याच्या मदतीने मधुमेह नियंत्रणात ठेवता येतो. व्हिटॅमिन सीने समृद्ध आवळा चहा रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे काम करते. यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते.*

*आवळा चहा चयापचय गतिमान करण्याचे काम करते ज्यामुळे लठ्ठपणा कमी होतो.*

## उन्हाळा झालाय सुरु, जाणून घ्या.... या सीजनमध्ये केळी खाण्याचे फायदे काय?



वर्षाचे बारा महिने बाजारात उपलब्ध असलेले आणि सर्वाधिक विकले जाणारे फळ म्हणजे केळी. पण तुम्हाला माहीत आहे का की हे साधे दिसणारे फळ केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. या ऋतूमध्ये केळीचे सेवन केल्याने अनेक आजारांपासून दूर राहता येते. मॅग्नेशियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन बी६ आणि इतर अनेक पोषक तत्वे केळीमध्ये आढळतात जे पचन आणि हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात. केळी खाल्ल्याने तुमच्या आरोग्यासाठी कोणते फायदे होतात ते जाणून घेऊया.

**पचनक्रिया सुधारते :** उन्हाळ्यात लोकांना पचनाच्या समस्या येतात. अशा स्थितीत या ऋतूत केळीचे सेवन केल्यास पचनक्रिया चांगली राहते. पचनक्रिया सुधारून तुम्ही अनेक गंभीर आजारांना बळी पडण्यापासून वाचता. त्यामुळे रोज केळीचे सेवन करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**लूज मोशनमध्ये फायदेशीर :** या ऋतूत उष्णतेमुळे लोकांना लूज मोशनचा त्रासही होतो. अशा परिस्थितीत केळीचे सेवन केल्याने त्यांना तात्काळ आराम मिळू शकतो. काळे मीठ मिसळून केळी खाल्ल्यास आराम मिळेल. यासोबतच केळीसोबत साखरेचे काही दाणे खाल्ल्यानेही तुम्हाला फायदा होईल.

**रक्त पातळ ठेवते :** केळी शरीरातील रक्त पातळ ठेवण्यास मदत करते. केळी रक्ताभिसरण देखील सुधारते. केळ्यामध्ये मॅग्नेशियम असते ज्यामुळे रक्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते. कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी झाले की रक्तवाहिन्यांमधील रक्ताभिसरणही सुरळीत होते.

**बद्धकोष्ठतेमध्ये फायदेशीर :** केळीचे सेवन बद्धकोष्ठतेच्या रुग्णांसाठी संजीवनी औषधी वनस्पतीसारखे आहे. याचे सेवन केल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळेल. यासाठी केळीसोबत दूध प्या. रोज रात्री झोपण्यापूर्वी याचे सेवन केल्यास बद्धकोष्ठतेवर फायदा होतो.

## जास्त मीठ खाण्याचे शरिरावर होतात दुष्परिणाम

मिठाशिवाय अन्नाला चव येत नाही। एखाद्या दिवशी जेवणात मीठ नसेल तर कितीही चांगलं असणारं अन् बेचव लागतं। पण मीठ योग्य प्रमाणात असेल तर त्याच जेवणाला चव येते। पण याच मिठाचं प्रमाण जास्त झालं। तर मात्र सगळं गणित बिघडतं। जास्त मीठ झाल्यास जेवणाची चव तर बिघडतेच शिवाय त्याचे शरिरावर आणि आरोग्यावरही नकारात्मक परिणाम होतात। जास्त मीठ खाणं धोक्याचं असतं। त्यामुळे तुम्हाला गंभीर आजार होऊ शकतात।



मीठामध्ये सोडियम ४० टक्के तर उर्वरित क्लोराईड असतं। हे सोडियम मीठाच्या माध्यमातून शरिरात जातं।सोडियमची शरिराला गरज असते। शरिरातील पेशींमध्ये प्लाझ्मा टिकून राहण्यासाठी, शरिरातील क्षार, पेशींचं कार्य संतुलित ठेवण्याचं काम करतं। मात्र हेच मीठ जर जास्त प्रमाणात खाल्लं तर त्याचे शरिरावर गंभीर परिणाम होतात।

जास्त मीठ खाण्याचे परिणाम

तुम्ही जेव्हा गरजेपेक्षा जास्त मीठ खाता तेव्हा त्याचा तुमच्या शरिरावर गंभीर परिणाम होतो। हृदयरोग, रक्तदाब वाढीच्या समस्या उद्भवतात। याशिवाय लठ्ठपणाचीही समस्या निर्माण होते। मीठ-सोडियमचं अति सेवन हे हृदयरोग आणि उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतं। यामुळे हार्टअॅटॅकचा धोका अधिक असतो।

किती मीठ खायला पाहिजे?

एका व्यक्तीने पाच ग्रॅम पेक्षा कमी मीठ खायला पाहिजे। २ ते ३ वर्षांच्या लहान मुलांना कमीच मीठ दिलं गेलं पाहिजे। गर्भवती महिलांना १,५०० मिलिग्रॅम म्हणजे चार ग्रॅमच्या आसपास मीठ खावू शकतात। खासकरून आयोडिन युक्त मीठ खाण्यावर भर दिला पाहिजे। बाहेरून आणत असलेल्या चमचमीत पदार्थांमध्ये मीठाचं प्रमाण अधिक असतं।चिप्स, कुरकुरे अशा पदार्थांमध्ये मीठाचं प्रमाण अधिक असतं। असे पदार्थ खाणं शक्यतो टाळलं पाहिजे। फ्रोजन किंवा साठवून ठेवलेले पदार्थ खाणं टाळलं पाहिजे। या ऐवजी ताजे पदार्थ खाल्ले पाहिजेत। घरी जेवण बनवतानाही मीठाचं प्रमाण कमी करा। कमीत कमी मीठाचं सेवन करा। चिप्स किंवा चमचमीत पदार्थ खाण्याऐवजी फळं, सुकामेवा असे पदार्थ खा थोडक्यात काय? तर चांगलं खा आणि आरोग्य सांभाळा

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

# ग्लोबल भारत

संपादक - शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा 'ग्लोबल भारत'





**मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....**

**✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻**

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com